# आधुनिक केसरी

मंगळवार, 04 ऑक्टोबर 2022

⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 61


Title Code : MAHMAR51117

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 04 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-61 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5


## चर्चेतली बातमी

### स्वांते पाबो यांना नोबेल

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** स्वीडनच्या स्वांते पाबो यांना वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. मानवी उत्क्रांतीच्या अनुवांशिकतेसंदर्भातील ( discoveries concerning the genomes of extinct hominins and human evolution ) अभ्यासासाठी त्यांचा हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. नोबेल समितीचे सचिव थॉमस पर्लमन यांनी याबाबतची घोषणा केली. स्वांते पाबो हे पॅलेओजेनेटीक्सच्या संस्थापकांपैकी एक आहेत. त्यांनी निएंडरथल जीनोमवर मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. ते जर्मनीतील लीपझिंग येथील मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूट फॉर इव्होल्यूशनरी एन्थ्रोपोलॉजी येथील जेनेटिक्स विभागाचे संचालकही राहिले आहेत. गेल्या वर्षीचे वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पारितोषिक डेव्हिड ज्युलियस आणि आर्डेन पेटामूटियम यांना देण्यात आले होते. या दोन्ही संशोधकांना शरीराचे तापमान, दाब आणि वेदना या रिसेप्टर्सचा शोध लावल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला होता.

# दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

## हैदराबादेत लष्कर-ए-तोयबासाठी काम करणाऱ्या तिघांच्या मुसक्या आवळल्या

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद : तेलंगण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. हैदराबादमध्ये राहणाऱ्या आणि लश्कर ए तोयबाच्या तीन संशयित दहशतवाद्यांना पोलिसांनी अटक केली आहे. या दहशतवाद्यांच्या टार्गेटवर भाजप आणि संघाचे दसऱ्याचे कार्यक्रम आणि दसऱ्याच्या मिरवणुका होत्या. दसऱ्याच्या कार्यक्रमांमध्ये बॉम्ब पेरून स्फोट घडवण्याचा या दहशतवाद्यांचा कट होता. हे दहशतवादी बॉम्ब फेकून सणांमध्ये स्फोट घडवणार होते. पण पोलिसांनी त्यांचा कट उधळून लावला आहे.**



मोहम्मद अब्दुल जाहेद उर्फ मोटू (राहणार मुसर्रमबाग), मोहम्मद समीउद्दीन (राहणार मलकपेठ) आणि माझ हसन फारूक (राहणार हुमायूं नगर) या तिघांना जुन्या हैदराबादजवळच्या परिसरातून अटक करण्यात आली. पोलिसांनी त्यांच्याकडून ४ हातबॉम्ब, ४ लाखांची रोकड आणि आक्षेपार्ह कागदपत्र जप्त केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप नेत्यांच्या हत्येचा कट रचल्या प्रकरणी त्यांच्यावर आरोप आहेत. तेलंगणची गुप्तचर यंत्रणा आणि विशेष कृती दलाने लश्करचा हा कट उघड केला आहे. धर्मांमध्ये द्वेष निर्माण करणे, दहशत माजवणे आणि नागरिकांमध्ये भीती निर्माण्याचा करण्याचा कट होता, अशी कबुली संशयितांनी दिली आहे. संशियत दहशतवाद्यांविरोधात देशद्रोहाचा कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

एफआयआरमध्ये आणखी चौघांची नावं आहेत. यात अदिल अफरोज, अब्दुल हदी, सोहेल कुरेशी आणि अब्दुल कलीम उर्फ हदी ही त्यांची नावं आहेत. ते सध्या फरार आहेत. सीमेपलिकडे असलेले लश्करचे हँडलर्स पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'च्या गुप्तहेराच्या संपर्कात होतो, अशी माहिती सूत्रधार जहेद याने रविवारी दिली. फरार असलेले तीन संशयित फरहतुल्लाह घौरी, सिद्दीक बिन उस्मान आणि अब्दुल माजिद हे पाकिस्तानमध्ये आहेत आणि ते आयएसआयसाठी काम करत असल्याचं सांगण्यात येतंय. जाहेद आणि त्याचे साथीदार हे सणासुदीच्या काळात भाजप आणि आरएसएसच्या कार्यक्रमात आणि मिरवणुकांमध्ये हातबॉम्ब फेकणार होते. हल्लेखोर भरती करण्यासाठी आणि दहशतवादी हल्ले करण्यासाठी घौरी, हंजला आणि माजीद हे जाहेदला पैसै पुरवत होते, अशी माहिती एसआयटीच्या अधिकाऱ्याने दिली.

## पायाभरणी



केंद्रीय रेल्वे तथा दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांनी औरंगाबादेत पिटलाईनची पायाभरणी केली. यावेळी त्यांनी रेल्वेस्थानकाची पाहणी करून पुनर्विकास आराखड्याचा आढावा घेतला. सोबत पालकमंत्री संदिपान भुमरे, डॉ. भागवत कराड, खा. रावसाहेब दानवे आदी.

## अंधेरी पोटनिवडणूक भाजपच लढणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाकडे राखीव निवडणूक चिन्हच नसल्याने अंधेरी (पूर्व) मतदारसंघातील तीन नोव्हेंबरला होणारी पोटनिवडणूक भाजपच लढविणार आहे. शिवसेनेतील फुटीनंतर प्रथमच होत असलेल्या पोटनिवडणकीत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा पराभव करण्यासाठी भाजपने आधीच तयारीही सुरू केली आहे.

मात्र याबाबत विचारता भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ही जागा भाजपने लढवायची की शिंदे गटाने आणि भाजप लढल्यास उमेदवारी कोणाला द्यायची, याचा निर्णय केंद्रीय संसदीय मंडळाकडून घेतला जाईल. शिवसेना आमदार रमेश लटके यांचे १२ मे रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले होते. ही जागा शिवसेनेकडे असल्याने शिंदे गट त्यासाठी दावा करीत आहे. लटके यांचे मुख्य मंत्री शिंदे यांच्याशी मैत्रीचे संबंध होते. त्यांच्या पत्नी ऋतुजा यांना शिवसेनेने उमेदवारी जाहीर केल्याने त्यांच्या विरोधात निवडणूक लढू नये, असा मतप्रवाह शिंदे गटातील काही नेत्यांमध्ये आहे. त्याचबरोबर शिंदे गटाकडे सध्या निवडणूक चिन्ह नाही. खरी शिवसेना कोणाची, या वादावर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी निर्णय होण्याची शक्यता नाही. त्यामुळे ही जागा भाजपनेच लढवावी, असे ज्येष्ठ भाजप नेत्यांचे मत आहे. शिवसेना फुटीनंतर प्रथमच होत असलेल्या पोटनिवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उमेदवाराचा पराभव केल्यास मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे मनोबल आणखी उंचावेल. शिवसेना-भाजप युती २०१९ मध्ये असताना ही जागा शिवसेनेच्या वाट्याला गेल्याने भाजपचे माजी नगरसेवक मुरजी पटेल यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. मुरजी पटेल यांनी निवडणूक लढविण्याची तयारीही सुरू केली आहे. मात्र भाजपच्या कार्यपद्धतीनुसार प्रदेश सुकाणू समितीत ही जागा कोणी लढवायची व उमेदवार कोण असेल, याबाबत प्रस्ताव तयार करून तो केंद्रीय संसदीय मंडळाकडे पाठविला जाईल व अधिकृत घोषणा केली जाईल, असे सूत्रांनी सांगितले.

# आदिवासी भागाला कर्टुल्यांनी दिला आर्थिक आधार

## आरोग्यदायी रानभाज्यांचा राजा कर्टुल्याला बाजारपेठेत मोठी मागणी

आधुनिक केसरी न्यूज


बंडू खडांगळे

दिंडोरी : सणासुदीच्या काळात दिंडोरी तालुक्यातील रानभाज्यांना मोठी मागणी असते. त्यामध्ये रानभाज्यांचा राजा समजल्या जाणाऱ्या कर्टुले या रानभाजीने तर सध्या ग्रामीण भागातील बळीराजांला व आदिवासी बांधवांना यंदा चांगला आर्थिक दिल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येक सणांला रानभाज्यांना मोठी मागणी ग्राहक वर्गातुन केली जाते. त्यात गणेश उत्सव असल्याने दिंडोरी तालुक्यातील रानभाज्यां महाराष्ट्रांत दुरदुर जात असतात.त्यात सध्या रानभाज्यांमधील राजा समजला जाणारे कर्टुले याला मोठी मागणी वाढली आहे. त्यामुळे आदिवासी भागांला ही रानभाजी सध्या आर्थिक आधार देणारी ठरत आहे. कर्टुले हे डोंगर माथ्यावर, दरी खोऱ्यात येणारी वेलवर्णिय वनस्पती मानली जाते. साधारणपणे ही वनस्पती पावसांळ्यात मोठ्या प्रमाणावर उगवते. ही वनस्पती भाजी आरोग्यदायी असल्याने बाजारपेठेत हिला मोठी मागणी असते. दिंडोरी तालुक्यातील बहुतेक भाग आदिवासी पट्ट्यात मोडत असल्याने जंगलातील रानभाज्या तसेच रानफळे विकुन उदरनिर्वाह करणारे या भागात आदिवासी बांधव दिसून येतात.त्यामुळे ग्राहक वर्गाला रानातील चांगल्या प्रतिच्या आयुर्वेदीक शरीराला उत्तम स्वास्थ्य देणाऱ्या भाज्या व फळे खायला मिळतात. या रानभाज्यांमध्ये कर्टुले नामक एक भाजी असुन ती भाजी शरीरांला आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.या भाजीला कुठलीही रासायनिक फवारणी या खत वापरले जात नाही.त्यामुळे नमक दर्जाची भाजी म्हणून ओळखली जाते. नैसर्गिक रित्या पावसाळ्यात येणारी प्रमुख भाज्यांमध्ये कर्टुले अत्यंत पौष्टिक अशी मौसमी भाजी आहे. तिला पाहुनी भाजी ही म्हणतात. कारण ही वनस्पती फक्त पावसांळ्यात येते की वर्षभर गायब राहाते. ही भाजी खाल्याने कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, मुळव्याध या आजारांवर ही वनस्पती लाभदायक असते.



सदर भाजी फक्त पावसांळ्यात येत असल्याने ग्रामीण व शहरी भागात हिला मोठी मागणी असते . सध्या मितीला जागेवर १००ते १५० रूपये प्रति किलो तर विविध बाजारपेठेत २५० पर्यंत चा भाव मिळत आहे . मध्यंतरीच्या काळात या भाजीला अत्यंत कमी भाव मिळत होता . तेव्हा आमचा वाहतूक खर्च फिटत नव्हता . परंतु आता थोड्याफार प्रमाणात भाव हा वाढल्याने खर्च सुटत आहे .

**योगराज रौंदळे, शेतकरी पुणेगाव**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## महिलांचा आंदोलनातील सहभाग

**एक लढा असाही (भाग-6)**

आधुनिक केसरी



या महिलांच्या आणि जनआंदोलनच्या रेट्यामुळे सरकारला ती संपूर्णपणे स्वीकारणे भाग पडले. अशा प्रकारे एक लढा, त्यातील विजय मग पुढे दुसरा लढा यापद्धतीने या आंदोलकांचे मनोधैर्य वाढत गेले. यापुढे केवळ अलकनंदा आणि तिच्या उपनद्या एवढेच आपले आंदोलनाचे क्षेत्र मर्यादित न ठेवता ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे नुकसान झाले आहे अशा पाणलोट क्षेत्रातील जंगल वाचवण्याचा या मंडळींचा निर्धार आहे. पण अजूनही सरकारला आणि वनखात्याला या जंगलतोडीमुळे पर्यावरणाच्या होणाऱ्या भीषण नुकसानीची पुरेशी कल्पना आली आहे असे म्हणता येत नाही कारण अजूनही वेगाने जंगलतोड सुरूच आहे. चिपको आंदोलनात सहभागी होणाऱ्या महिलांचा ही झाडे वाचवण्यात सिंहाचा वाटा आहे. जी झाडे तोडायची आहेत, त्यावर ठेकेदार खुणा करून ठेवतात. नंतर ती तोडण्यासाठी पुन्हा आपल्यासोबत मजूर येऊन येतात. अशा वेळी हे आंदोलन करणाऱ्या गावातील साध्या, अशिक्षित पण पर्यावरणाविषयी कमालीच्या जागरूक असणाऱ्या या स्त्रिया एकत्र येऊन या मार्किंग ( खुणा ) केलेल्या झाडांना राखी बांधतात. आपले रक्षण करणारे हे वृक्ष आपले बंधू आहेत. ते आम्ही तोडू देणार नाही अशा प्रकारचा निर्धार त्यांचा असतो. ठेकेदारांना त्या ही विनंती करतात. काही वेळा त्यांचे किंचित दुर्लक्ष झाले किंवा त्या गाफील असताना ठेकेदारांनी झाडे तोडली तर त्यांना कमालीचे दुःख होते. अशा परिस्थितीत अशा तोडलेल्या झाडांना सदगती मिळावी म्हणून या ठिकाणी चक्क भागवताचे पारायणही केले जाते. गावातील भाविक महिला या वेळी एकत्र येऊन या धार्मिक कार्यक्रमात मोठया संख्येने सहभागी होतात. भागवत सांगणारे मग वृक्षांचे आपल्या जीवनातील महत्व, जंगलतोडीचे दुष्परिणाम यासारख्या गोष्टी आपल्या प्रवचनातून कथन करतात. जी झाडे अर्धवट तोडलेली असतात किंवा ज्यांच्या काही फांद्या तोडल्या जातात अशा ' जखमी ' वृक्षांना या स्त्रिया चिखल पाण्याची मलमपट्टी करतात. वृक्षांना जणू आपल्याच कुटुंबातील एक सदस्य मानून त्यांची देखभाल करणाऱ्या या अशिक्षित स्त्री पुरुषांनी हे पर्यावरणाचे ज्ञान प्रत्यक्ष त्या परिसरात राहून, त्या परिस्थितीशी झगडून मिळवले आहे. जंगलतोडीने निर्माण झालेल्या या पर्यावरणाच्या समस्यांना केवळ ठराविक साच्याची उत्तरे देता येणार नाहीत. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## विवाहासाठी ग्लॅमर नाही, ग्रामर आवश्यक

आधुनिक केसरी

आपण प्रत्यक्षांत जे नाहीत ते आहोत असे जगाला दाखवण्याच्या केविलवाणी प्रयत्नांत आपला अहंकार आणि दंभ वाढत असतो, त्यामुळे ती समजण्याची जाणीवच उरलेली नसते. मोठेपणाच्या अट्टाहासाने एक वेळ अशी येतेच कि, अनेक बाबतीत आपला अभ्यास कमी आहे आणि खोटेपणा लपवण्याची धडपड सुरु आहे हे स्पष्ट होते. निर्माण केलेला अभास हा फार काळ टिकत नसतो, हे न समजणे हीच खरी उणिव असते. अभासाचा विपरीत परिणाम काहीवेळा काही विवाहांच्या पश्चात घडून आल्याचे आपल्याला समजते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विवाह निश्चित करताना ग्लॅमर नाही, तर ग्रामर महत्वाचं असतं; केवळ दिखाऊपणा, आभास नाही तर अभ्यास महत्वाचा ठरतो. तिथेदेखील सुरुवातीचा आभास कितीही प्रभाव निर्माण करणारा असला, तरीही कालांतराने प्रभावापेक्षा मूळ स्वभाव आणि एकूणच अभ्यासातील अभाव दिसून येऊ लागतो. सुरुवातीला चमकणारे सोने कालांतराने तांबे असल्याचे कळले कि अभ्यासाचा अभास केल्याचे पितळ उघडे पडते. पवित्र मानल्या जाणाऱ्या, विवाहाच्या संस्कारांतून निर्माण होणाऱ्या नात्यासाठी काहीवेळा वधू-वर यांच्या निवडीत देखील अभ्यासाचा अभाव असल्याचे दिसून येते. संपूर्ण आयुष्य सहजीवनाच्या मार्गाने व्यतीत करायचे असते, हे सर्वज्ञात असूनही अवघ्या काही तासांत विवाह निश्चित केले जातात. काहीवेळा अभ्यासाचा अभाव, तर काहीवेळा अभास असल्याचे कळते पण वळत नाही. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आभासी दुनियेचे आकर्षण फार नसावे कारण नेहेमी अभ्यासच महत्वाचा ठरत असतो. करिअरची निवड करण्यासंबंधीचा सखोल अभ्यास केला नाही आणि केवळ आभासाला भुलून निर्णय घेतला तर, त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.



आधुनिक केसरी

### मूर्ती वात्सल्याची | प्रगटली ||

वात्सल्याचा पान्हा | आनंदाचे घर ||
जीवनाचे सार | प्रेमरस ||१||

प्रेमावीन जीणे | वांझोटे बोथट ||
काय होलपट | कामा येते ? ||२||

असोनी कुबेर | प्रेमाचा भिकारी ||
हिंडे दारोदारी | पिशाच्च ते ||३||

संत उपदेश | प्रेमामृत जाण ||
कर सोडवण | वेड्या जीवा ||४||

वात्सल्याचे देणे | ईश्वरी प्रसाद ||
नसावा उन्माद | माझ्या मना ||५||

धन्य ज्ञानेश्वर | माऊली विश्वाची ||
मूर्ती वात्सल्याची | प्रगटली ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं यशदायिनि ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कीर्तिप्रदे नमो नमः।। ३४ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. यशदायिनी अशा तुला नमस्कार असो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. कीर्तीदायिनी अशा तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं ममारिनाशहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे सुहृदां हिताय च।। ३५ ।।**
माझ्या शत्रूंच्या नाशासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझ्या मित्रांच्या हितासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो.

## नवरात्राची सहावी माळ



आधुनिक केसरी

आज आपण देवीला नववी माळ वहाणार आहोत. नवदिवसांत आपण देवीची पूजाअर्चा मनोभावे केली . मातेलाआपली भोळी भाबडी सेवा रूजू असेल अशीच सेवा करून घे असा आशिर्वाद मागुया.
आज नवदिवसांचे पारणे असते यालाच घट ऊठले असेही म्हणतात.
आज नव दिवसांचे पारणे फेडले जाते. कुलधर्म कुलाचार केला जातो.
सप्तशती, नवचंडीचा देवी पुढे याग केला जातो. जोगवा मागीतला जातो.
गोंधळजाग्रण केले जाते. देवीच्या वेगवेगळ्या रूपांचा ऊत्सव म हणजे नवरात्र होय. शैलीपुत्री, ब्रम्हचारिणी चंद्रघटा, कुष्मांडी, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री,महागौरी, सिध्दीदात्री अशा नवरूपात देवीची पूजा केली जाते. आपले सगळे सण ऊत्सव व्रते कुलधर्म कुलाचार हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात.आपण आधुनिक युगात वावरतो. भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे झाली. यात आपण काय शिकलं पाहिजे तर संस्कृती सवर्धन केली पाहिजे . देवीच्या रूपात परस्त्रीला पाहिले पाहिजे. तिला मातेसमान वागणूक दिली पाहिजे. कालच आपण कन्यापूजनाचे महत्व समजून घेतले. मुलीला देवीच्या रूपात पाहिले पाहिजे. म्हणजे तरी बायका मुलींवर होणारे अत्याचार थांबतील. देवीमाता असे अत्याचार करणाऱ्यांना धडा शिकवेल. नवरात्रात देवी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समोर होम हवने करतात. आपण आधुनिक विचाराने प्रेरित होऊन ह्याचा ऊपयोग समाजाच्या ऊध्दारासाठी करूयाहोमात ज्या समिधा टिकतात. तर आपण वाईट विचार नष्ट होऊ दे म्हणून समिधा टाकु . समाजातील दुर्बल लोकांना न्याय मिळू दे.अत्याचार अन्याय, नुसता बोलघेव्डेपणा असणा-या लोकांना चांगली बुध्दी दे. सर्वांना शिक्षण आरोग्य,ऐश्वर्यसंपन्न होऊ दे. समाजासाठी समाज झटला पाहिजे अशी समाजरचना सर्वमान्य होऊ दे. किळसवाणे राजकारण नको आहे. तर समाजासाठी ध्येयाने प्रेरित असणारे जे जे कोणी सच्चे भारतीय असतील की ज्यांना खरचं "बलशाली भारत"बनवायचा आहे त्यांच्या हाताला यश दे. अशा अनेक मंगलमय आशिर्वालाच समाजाला गरज आहे यासाठी नवरात्राचा हा स्त्री शक्तिचा ऊत्सव लोककल्याणा साठी होवो.आपल्या सर्वांचे कल्याण करणारी अष्टभुजा देवी आहे मांगल्याचा जोगवा मागुन देवीला आज पंचपक्वांनाचा नैवैद्य अर्पण करूयाक्षमारूपी लवंग,वैराग्याचा कात सुबुध्दीचा वेलदोडा, वैराग्याची जायपत्री,अशा सर्व साहित्याने एकरूप झालेला विडा देवीला अर्पण करूया व नवरात्राची ही नववी माळ "आई राधा ऊदे ऊदे "अशा गजराने करून नवदिवसांचे पारणे करूया
तू सच्चिदानंदप्रणवरूपिणी।।
सकल चराचरव्यापिनी।।
सर्गस्थित्यंतकार णी।
भवमोचनी ब्रम्हानंदे।।
आई दुर्गामातेच्या चरणीं नित्य वंदन

## चला कोल्हापुरी जाऊ...

### आठवी, नववी माळ

आधुनिक केसरी

नमस्कार, शीर्षकात उल्लेख केल्याप्रमाणे.
आजच्या आठवणी आणि दर्शन जरा स्पीडमध्ये आहेत. असो. पैकी ..अगोदर आठवी माळ-अष्टमी ..आज बहुतेकजण उपवास करीत असतात. खरे तर नवरात्र उत्सवत्यात रोजच्या कार्यक्रमात मन इतके रमून जाते की तहान भूक हरपून जाते.
आठवी माळ अर्पू या आजलामातेच्या महालक्ष्मी या रुपाला
नगर कोल्हापूर नवरात्रीला सजले
अंबाबाईच्या दर्शना जन आतुरले
कोल्हापूर क्षेत्र पूर्ण शक्तीपीठ हे
अंबाबाईचे भक्त इथे अलोट जमले।।
कोल्हापूर -श्री महालक्ष्मी -अंबाबाईच्या दर्शनाचा योग तीन दशकांच्या कालावधीत अनेकदा आलेला आहे. माझ्या लक्षात असलेले अविस्मरणीय दर्शन योग " माझ्या साहित्यिक लेखनाच्या योगदानामुळे आले आहेत. बालकुमार साहित्य सभा कोल्हापूर ..यांचा साहित्य पुरस्कार ..घेण्यासाठी सपत्नीक कोल्हापूर प्रवास झाला, त्या मुक्कामात सकाळ-संध्याकाळ मनभरून पाहिजे तितका वेळ मंदिरात बसून अंबाबाई डोळा भरून पाहिली. अ.भा.बा.कु.सा. सम्मेलनसांगली येथे झाले होते.. ००८-०९ मध्ये - संमलेन अध्यक्ष आदरणीय विजया वाड यांच्या हस्ते अमरेंद्र गाडगीळ बाल साहित्य संशोधन लेखन निबंध लेखनाचा पुरस्कार -मला प्रदान करण्यात आला. पुरस्कार घेऊन सांगलीहून कोल्हापूरला श्री महालक्ष्मी चरणी रुजू झालो. लगेच २०२१० मध्ये पुन्हा सांगली - महाराष्ट्र शासनाचा साहित्य राज्य पुरस्कार वितरण सोहोळा. यात माझ्या "बाल साहित्य मराठवाड्याचे -नवे स्वरूप नव्या वाटा "या ग्रंथ -लेखनास मिळालेला2008-2009" बालसाहित्याचा ".दि.के.बेडेकर-बाल साहित्यसमीक्षा पुरस्कार" घेण्यासाठी आम्ही सहपरिवार उपस्थित राहिलो. पुन्हा एकदा कोल्हापूर श्री महालक्ष्मी आईच्या चरणी हा सर्वोच्च पुरस्कार "ठेवून दर्शन घेतले. आजरा येथे झालेल्या अ. भा. बाल कुमार मराठी साहित्य संमेलनासाठी साहित्यिक-ऋग्वेद मासिकाचे संपादक-सुभाष विभूते यांनी आवर्जून निमंत्रित केले आणि आजरा सहभह नोंदवून मुक्कामी कोल्हापूर. अगदी छानदर्शन, महाप्रसाद घेण्याचा योग आला. अगदी अलीकडे कोल्हापूरला बालकुमार सभेच्या वतीने एक मेळावा झाला तो कोरोनाकाळाच्या आधी.
हे दर्शन त्रिपुरारी पौर्णिमेच्या पर्वकाळी झाले. हे सगळं आठवतं तेव्हा म्हणावे वाटते की
"आईची कृपा मजवरी आहे"..हेच खरे.

**नववी माळ**

**जागर देवी दर्शनाचा**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

२००६ पासून परभणीहून पुण्यात वास्तव्यास आल्यावर इथल्या सांस्कृतिक उत्सवाचा श्रोता, प्रेक्षक म्हणून आस्वाद-आनंद घेण्याचे पर्व सुरू आहे. गुरुवार, शनिवार आणि ज्या ज्या वेळी लक्ष्मी रोड, तुळशीबाग, मंडईत जाणे होते आशा वेळी, पुण्यातील मंदिरात गर्दीच्या वेळेत न जाता दर्शन घेण्याचा आनंद घेत असतो. पुण्याचे ग्राम दैवत - तांबडी जोगेश्वरी इतरवेळी आणि चक्क नवरात्रीत दर्शन घेण्यातखरेच एक वेगळे समाधान आहे. सारस बागेच्या परिसरात श्री महालक्ष्मी मंदिर, कोथरूडमधील श्री.वनदेवी मंदिर, शिवाजी पुतळ्याजवळ असलेले श्री तुळजा भवानी मंदिर, गणंजय सोसायटीत असलेल्या एका खाजगी निवासात असलेल्यादेवीच्या मंदिरात तीन ही देवींच्या मूर्ती आहेत.
चिंचवडला ही दर्शन फेरी होत असते. महोत्सव असो की उत्सव त्याचे आनंददायक स्वरूप, साजरा करण्याचा उत्साह, आनंद घेण्याची वृत्ती "आणि सणा-सुदीचे भारलेले वातावरण हे अनुभवयास.
"पुण्यात असायला हवे" हे इथे राहू लागल्यावर अनुभवता येते. आम्हाला हे भरभरून मिळते आहे.
यालाच आई जगदंबेची कृपा" म्हणायचे.
आईच्या चरणी - सर्वांच्या कल्याणार्थ प्रार्थना -
हे आई-आदिमाया आई अंबाबाई
आणण्या दुर्जनांना वठणी
धैर्य -बल सज्जनांना देई
आलो दर्शनासी जगदंबा आई
टेकवीमाथा तव चरणी आई ..।।

# मराठवाडा प्रदेशासाठी स्वतंत्र रेल्वे झोन मंजूर करून विकासाचा अनुशेष भरून काढा

## चंदुलाल बियाणी यांचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा हा अत्यंत मागासलेला प्रदेश स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबादस्थित निजामशाहीच्या अधिपत्याखाली होता. स्वातंत्र्यानंतर आणि हैद्राबाद-मराठवाडा मुक्ती संग्रामात नंतर भाषावार प्रांतरचना झाली. तेव्हा हा प्रदेश महाराष्ट्रात बिनशर्त सामील झाला. परंतु या प्रदेशाच्या विकासाचा अनुशेष मात्र अद्याप भरून निघाला नाही. त्यामुळे मराठवाडा प्रदेशासाठी स्वतंत्र रेल्वे झोन मंजूर करून विकासाचा अनुशेष भरून काढावा, अशा मागणीचे निवेदन परळी रेल्वे संघर्ष समिती अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांना दिले.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, आपणास कळविण्यात अत्यंत खेद होतो की, स्वातंत्र्यानंतरची ७५ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी उलटून गेली तरीही लातूररोड ते लातूर दरम्यानच्या केवळ ३३ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाखेरीज एक मीटर लांबीचा देखील नवीन रेल्वे मार्ग या अतिमागास भागास मिळाला नाही. रेल्वे मार्गांचे पुरेसे जाळं नाही म्हणून चांगले उद्योग धंदे येत नाहीत




आणि मोठे मोठे उद्योग येथे नाहीत म्हणून नवीन रेल्वे प्रकल्प नाहीत अशा दुष्टचक्रात हा अतिमागास मराठवाडा प्रदेश अडकला आहे. मराठवाड्याचे एक सुपुत्र, स्वातंत्र्य सेनानी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री दिवंगत डॉ. शंकरराव चव्हाण यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक प्रयत्न करून मराठवाड्यासाठी निदान स्वतंत्र "नांदेड रेल्वे डिव्हिजन" तरी



मिळविले. परंतु रेल्वे मार्गाचे अधिक जाळे आणि पुरेशा प्रमाणात लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या या व इतर बाबतीत हा भाग सतत दुर्लक्षितच राहिला आहे.

वास्तविक पाहता हैद्राबाद-सिकंदराबाद ते मनमाड; आदिलाबाद ते नांदेड; अकोला ते पूर्णा ; परभणी ते परळी वैजनाथ; हैद्राबाद-सिकंदराबाद ते परळी वैजनाथ आणि कुर्डुवाडी ते लातूर रोड इत्यादी रेल्वे मार्ग अंशतः मराठवाडा प्रदेशातून जातात. त्यापैकी केवळ लातूर रोड ते कुर्डुवाडी हाच रेल्वे मार्ग मुंबई स्थित मध्य रेल्वे झोन अंतर्गत सोलापूर रेल्वे डिव्हिजन मध्ये तर उर्वरित सर्व रेल्वे मार्ग हैद्राबाद स्थित दक्षिण मध्य रेल्वे झोन अंतर्गत नांदेड रेल्वे डिव्हिजनच्याच अधिपत्याखाली येतात. परंतु नांदेड रेल्वे डिव्हिजन अंतर्गत बहुसंख्य गावे मराठी भाषिक असल्याने तेलुगू भाषेचे प्राबल्य असलेल्या दक्षिण मध्य रेल्वे झोनच्या सिकंदराबाद येथील मुख्यालयातील अधिकारी मराठवाडा प्रदेशातील जनतेला नेहमीच सापत्न भावनेने वागवितात. त्यामुळे आपणास विनंती करण्यात येते की, कोकण रेल्वे प्राधिकरणाच्या धर्तीवर स्वतंत्र मराठवाडा रेल्वे झोन अथवा प्राधिकरण मंजूर करून या प्रदेशाच्या विकासाचा अनुशेष भरून काढून उपकृत करावे. सध्या मराठवाडा मुक्ती दिनाचाही अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. त्या निमित्ताने सरकारतर्फे ही किरकोळ परंतु रास्त मागणी निश्चित मान्य होईल, हीच अपेक्षा. या निवेदनावर परळी रेल्वे संघर्ष समिती अध्यक्ष चंदुलाल बियाणी, सरचिटणीस जी.एस. सौदळे गुरुजी, सचिन सौदळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# वासनेचे बीज नष्ट करण्यासाठी गुरु नामस्मरणाचा मंत्र सर्वश्रेष्ठ

## महंत रामगिरी महाराज : श्री क्षेत्र सराला बेटावर होमहवन

आधुनिक केसरी न्यूज

**महालगाव :** आधुनीक काळातील बऱ्याच सुशिक्षीत लोकांना नामस्मरण हे गावंढळपणाचे वा भोळसट श्रद्धेचे लक्षण वाटत असते. नामस्मरण ही म्हाताऱ्या-कोताऱ्यांनी वा निवृत्त माणसांनाही फावल्या वेळात करण्याची गोष्ट आहे असा त्यांचा समज असतो. या समजाला त्यांचे अज्ञानच कारणीभूत असते असे म्हणावे लागेल. माणसाला आपल्या दैनंदीन आयुष्यात अडीअडचणींना तोंड द्यावे लागते. कितीही प्रयत्न केले तरी कठीण प्रसंगातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. अशा वेळी आध्यात्मिक लाभासाठी व मनातील वासनेचे बीज नष्ट करण्यासाठी गुरुनामस्मरणाचा मंत्र सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले .

क्षेत्र सराला बेटाचे योगीराज गंगागिरी महाराज व ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व परंपरेत आलेला दुर्गा ष्टमीस गुरूमंत्राची भाविकांना दिक्षा दिली जात.आजही सोमवार दिं . 3 रोजी दुर्गाष्टमी निमित्ताने बेटात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दुपारी यज्ञाची पुर्णाहूती होताच,महंत रामगिरी महाराजांनी हजारो भाविकांना उघड नामस्मरण मंत्राची दिक्षा दिली.

यावेळी प्रवचनातून उपस्थितांना मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की, अडचणी वेळी प्रत्येकाला देव आठवतो तो मग परमेश्वराला शरण जातो. कृपा करून माझे अमुक अमुक कार्य सफल होऊदे असे विनवतो. वेळप्रसंगी देवाला अर्धा-एक किलो पेढ्यांची लाचही देतो. पण हे करत असताना तो हा विचार करत नाही की देवाने तुम्हाला मदत का करावी? तुम्ही देवासाठी असे काय केले आहे की ज्यामुळे देवाने आपले काम सोडून तुमच्या मदतीस धावावे?

देवाच्या नामात एक शक्ती असते जी केवळ भक्ताला कळू शकते. भक्ताला नामस्मरणातून अपार आनन्द प्राप्त होत असतो. आपल्या दैवताचे गुणगान, स्मरण आणि चिंतन करणे ही ही एक ध्यान धारणाच आहे. केलेले प्रत्येक स्मरण साधकाचा आध्यात्मिक बॅंक बॅलन्स वाढवत असतो. मग आयुष्यातील कठीण प्रसंगात त्याला हाच बॅंक बॅलन्स मदतीस येतो. त्याला एक भक्कम मानसिक आधार सापडतो. त्याच्या प्रार्थनेला, मनाला आणि इच्छा शक्तीला योग्य एक नियोजीत दिशा सापडते. परमेश्वर मग आपल्या भक्ताकडे आवर्जून लक्ष देतो. कालांतराने मग तो भक्ताच्या लक्षात आणून देतो की केवळ भौतिक गोष्टींसाठी माझा धावा करण्यापेक्षा आध्यात्मिक प्रगतीसाठी तो कर. भक्त मग नामस्मरणात आकंठ डुंबत हा संसार सागरही पार करू शकतो, असे महाराज म्हणाले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत वैजापूरचे आमदार प्रा.रमेश बोरनारे, शिक्षण व आरोग्य सभापतीअविनाश पाटील गलांडे, वैजापूरचे उपनगराध्यक्ष साबेर भाई खान, माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी, संजय निकम, भाऊलाल सोमासे, बाळासाहेब कापसे, रामनाथ वाघ,सचिन जगताप,दत्तू पाटील खपके, सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, हरिशरणगिरी महाराज, संदीपान महाराज,आदीसह बेटातील सर्व विद्यार्थी भाविकांची उपस्थिती होती.



केंद्रीय दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा करताना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे.




# डी. के. अडचणीत

आधुनिक केसरी

नॅशनल हेराल्ड प्रकरणी डी. के. शिवकुमारांना ईडीचे समन्स काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली 'भारत जोडो यात्रा' कर्नाटकात पोहचली आहे. आज या पदयात्रेचा कर्नाटकात चौथा दिवस आहे. त्यात आता अंमलबजावणी संचालनालयाने कर्नाटक काँग्रेसचे अध्यक्ष डी. के. शिवकुमार यांना समन्स बजावलं आहे. नॅशनल हेराल्ड आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी हे समन्स बजावल्याचे सांगण्यात येत आहे. डी. के. शिवकुमार हे कर्नाटकात सुरु असलेल्या 'भारत जोडो यात्रे'त सहभागी आहेत. त्यातच त्यांना ईडीने समन्स बजावलं आहे. त्यानुसार ७ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील फेडरल तपास संस्थेसमोर हजर राहण्यास सांगितलं आहे. नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणात हे समन्स बजावण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, यापूर्वी १९ सप्टेंबर रोजी बेहिशोबी मालमत्ताप्रकरणी डी. के. शिवकुमार यांची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर ईडी कार्यालयातून बाहेर पडल्यावर प्रसारमाध्यमांशी बोलताना डी. के. शिवकुमार यांना सांगितलं, "एका आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आलं आहे. मात्र, मला या प्रकरणाबाबात काहीच माहिती नाही. चौकशीवेळी ईडी अधिकाऱ्यांनी माझ्या ट्रस्ट आणि भावाकडून यंग इंडियाला देण्यात आलेल्या पैशांबद्दल विचारले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्थापन केलेले 'नॅशनल हेरॉल्ड' वृत्तपत्र इ.स. २००८ साली बंद पडले. पं. जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटिश साम्राज्यशहांना विरोध करण्यासाठी १९३८ मध्ये सुरू केलेले हे काँग्रेसचे मुखपत्र होते. हे वृत्तपत्र बंद पडल्यानंतर 'यंग इंडिया' कंपनीने २०१० साली ते विकत घेतले. यंग इंडिया लिमिटेड या कंपनीची स्थापना नोव्हेंबर २०१० साली झाली होती. या कंपनीमध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा सर्वात मोठा म्हणजे ७६ टक्के वाटा होता. नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र २००८ पासून आर्थिक तोटा होत असल्याचं कारण देत बंद करण्यात आलं होतं. काँग्रेसने पुढे जाऊन 'एजेएल'ला ९० कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्ज दिले. पक्षाने सांगितले की, हे पैसे वृत्तपत्राला परत आणण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात मदत करण्यासाठी होते. तथापि, वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन होऊ शकले नाही आणि एजेएल कॉंग्रेसचे कर्ज फेडण्यात अपयशी ठरले. २०१० मध्ये काँग्रेसने 'एजेएल'कडे ९० कोटींच्या कर्जाची रक्कम परत मागितली. मात्र त्यावेळी कंपनीकडे एवढे पैसे नव्हते. त्यामुळे कंपनीने त्यांच्याकडील मालकी ही गांधींच्या मालकीच्या यंग इंडिया कंपनीकडे सुपूर्द केली. यासाठी यंग इंडियाने 'एजेएल'ला केवळ ५० लाख रुपये दिले. याचवरुन गांधींनी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी ताब्यात घेतली आणि या कंपनीच्या मालकीची २००० कोटींची संपत्तीही आपल्या ताब्यात घेतल्याचा आरोप केला जातोय. नोव्हेंबर २०१२ मध्ये सुब्रह्मण्यम स्वामी यांनी या प्रकरणामध्ये खासगी तक्रार दाखल करत गांधी कुटुंबाने सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी त्यांच्या मालकीच्या यंग इंडिया लिमिटेडच्या मालकीची करुन घेतल्याचा आरोप केला.

# श्रीरामांनी केलेली भक्ती-आराधना म्हणजेच विजयादशमी

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

रघुकूल नायक मर्यादा पुरुषोत्तम जगद वंदय प्रभु श्रीराम यांच्या जीवनात सुद्धा एक दिवस कठिण प्रसंग आला आणि न्याय सत्य धर्माची बाजु असताना देखील शक्ती आपल्या बाजुने न लढता आज रावणाच्या असत्त्याच्या बाजुने लढत आहे. हे लक्षात आल्यानंतर प्रभु श्रीराम यांच्या समवेत युद्धातील प्रमुख सहकारी, लक्ष्मण, सुग्रीव, बिभिषण, हनुमंत, जांभुवंत, अगंद हे सगळे विचार विमर्श करण्यासाठी एकत्र बसले . जेव्हा ज्ञान असुन कामी येत नाही. तेंव्हा अनुभव कामी येतो. आणि या वेळी जांबुवंत यांनी एक सुचना केली की, रावण दुष्ट असुन उपासना-आराधना करून शक्ती प्रसन्न करू शकतो. आपण सत्याच्या बाजूने आहेत. आपण शक्ति-आराधना आरंभ करावी. आम्ही सगळे युद्ध सांभाळु जांबुवंत यांची विनंती ऐकुन सगळे आनंदी प्रसन्न झाले आणि भव्य दिव्यशक्ती-आराधना-पुजा आरंभ केली. सदरची पुजा नऊ दिवस देवीची आराधना प्रभु श्रीराम यांनी केली व शेवटच्या क्षणी देवीने कठिण परिक्षा घेतली.

धिरोदत प्रभु श्रीराम यांच औदार्य पाहुन भक्ती निष्ठा समर्पण कामी आलं. देवी स्वतः प्रकट झाली व विजयीभव आशिर्वाद दिला. प्रभु श्रीराम यांची आराधना यशस्वी झाली. हा शुभदिन म्हणजे विजयादशमी नवरात्र महोत्सव दसरा होय.....!

राम की शक्तिपूजा का एक अंश-
रवि हुआ अस्त, ज्योति के पत्र पर लिखा
अमर रह गया राम-रावण का अपराजेय
समर।
आज का तीक्ष्ण शरविधृतक्षिप्रकर, वेगप्रखर,
शतशेल सम्वरणशील, नील नभगर्जित स्वर,
प्रतिपल परिवर्तित व्यूह भेद कौशल समूह
राक्षस विरुद्ध प्रत्यूह, क्रुद्ध कपि विषम हूह,
विच्छुरित वह्नि राजीवनयन हतलक्ष्य बाण,
लोहित लोचन रावण मदमोचन महीयान,
राघव लाघव रावण वारणगत युग्म प्रहर,
उद्धत लंकापति मर्दित कपि दलबल विस्तर,
अनिमेष राम विश्वजिद्दिव्य शरभंग भाव,
विद्धांगबद्ध कोदण्ड मुष्टि खर रुधिर स्राव,
रावण प्रहार दुर्वार विकल वानर दलबल,
मुर्छित सुग्रीवांगद भीषण गवाक्ष गय नल,
वारित सौमित्र भल्लपति अगणित मल्ल रोध,
गर्जित प्रलयाब्धि क्षुब्ध हनुमत् केवल प्रबोध,
उद्गीरित वह्नि भीम पर्वत कपि चतुःप्रहर,
जानकी भीरू उर आशा भर, रावण सम्वर।
लौटे युग दल। राक्षस पदतल पृथ्वी टलमल,
बिंध महोल्लास से बार बार आकाश विकल।
वानर वाहिनी खिन्न, लख निज पति
चरणचिह्न
चल रही शिविर की ओर स्थविरदल ज्यों
विभिन्न।
'राम की शक्तिपूजा' की कुछ अन्तिम
पंक्तियाँ देखिए-
"साधु, साधु, साधक धीर, धर्म-धन धन्य
राम !"
कह, लिया भगवती ने राघव का हस्त थाम।
देखा राम ने, सामने श्री दुर्गा, भास्वर
वामपद असुर स्कन्ध पर, रहा दक्षिण हरि
पर।
ज्योतिर्मय रूप, हस्त दश विविध अस्त्र
सज्जित,
मन्द स्मित मुख, लख हुई विश्व की श्री
लज्जित।
हैं दक्षिण में लक्ष्मी, सरस्वती वाम भाग,
दक्षिण गणेश, कार्तिक बायें रणरंग राग,
मस्तक पर शंकर! पदपद्मों पर श्रद्धाभर
श्री राघव हुए प्रणत मन्द स्वरवन्दन कर।
"होगी जय, होगी जय, हे पुरूषोत्तम नवीन।"
कह महाशक्ति राम के वदन में हुई लीन।



लंकापती रावण आणि प्रभु श्रीराम यांच्या दरम्यान चालू असलेलं युद्ध निर्णायक वळणावर असताना एक दिवस रावणाने व राक्षस सैन्याने वानरसेना खुप जबरदस्त झुंज दिली. अगदी तो दिवस खुप प्रभावी ठरला. रावणासाठी युद्धाच्या सुरवातीपासून म्हणजे सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत रावण युद्धावर प्राबल्य राहिल. साक्षात शक्ती रावणाच्या बाजुने लढत आहे हे प्रभु श्रीराम यांनी पाहिलं. अगदी संध्याकाळी युद्ध संपुण सगळे आप आपल्या शिबीरात पोहचले सगळे राक्षस अगदी आनंदाने नाचु लागले होते. तर वानरसेना चिंताग्रस्त होती. हे सगळं पाहुन प्रभु श्रीराम हे खिन्न झाले आणि नेमकं याच वेळी सुर्यास्त झाला होता. पण याच वेळी हार न मानता प्रभु श्रीराम यांच्या मनात आशेचा नविन किरण निर्माण झाला आणि आपले प्रमुख सहकारी यांच्या सोबत विचार-विमर्श करण्यासाठी बैठक घेतली. याच दरम्यान अनुभवी जांबुवंत यांच्या सुचनेनुसार निर्णय झाला कि प्रभु श्रीराम यांनी शक्ती-पुजा-आराधना आरंभ करावी. तोपर्यंत बाकी सर्व वीर युद्ध चालू ठेवतील. दरम्यान पुजा संपन्न झाल्यानंतर एकशे आठ कमल पुष्प प्रभु श्रीराम देवीच्या चरणी चढवतील व पुजा निर्विघ्न संपन्न होईल.

यासाठी एकशे आठ कमल पुष्प हनुमानजी यांनी तातडीने आणले. नऊ दिवसाची नवरात्री आराधना चालु झाली. पहिल्या दिवसांपासून एक एक क्षण प्रभु श्रीराम हे आपल्या प्रभावी धेय्य शक्तिने निष्ठा पुर्वक आराधना करत होते. अगदी शेवटचा दिवस शक्ति-पुजा-आराधना झाल्यानंतर देवी प्रसन्न होईल व पुजा निर्विघ्न चालू होती असं असताना आराधना पुजा पुर्ण करत असताना प्रभु श्रीराम एकरूप होऊन कमल पुष्प देवी चरणी अर्पण करत होते.एकशे सात कमल पुष्प अर्पण केले. पुजा अगदी शेवटच्या टप्प्यात देवी प्रसन्न होणार एकच कमल पुष्प अर्पण करणं बाकी असतानाच शेवटचं कमल पुष्प अर्पण करण्यासाठी जेव्हा प्रभु श्रीराम सज्ज झाले. तेंव्हा मात्र अनपेक्षित धक्का बसला. शेवटचं कमल पुष्प थाळी मध्ये नाही. पुजा आराधना शेवटच्या क्षणी अर्धवट राहिल आणि शक्ति प्रसन्न होणार नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली. याच दरम्यान प्रभु श्रीराम यांनी आपल्या भात्यातील बाण काढला क्षणाचाही विलंब न करता शेवटचं कमल पुष्प म्हणून आपला स्वतःचा डोळा बाणाने काढणार आणि देवी चरणी अर्पण करणार तोच इतक्यात साक्षात स्वतः शक्ति प्रभु श्रीराम यांची परिक्षा घेण्यासाठी गायब केलेल्या कमल पुष्पा सह देवी प्रकट झाली. प्रभु श्रीराम यांची साधना-आराधना शक्ती-पुजा यशस्वी झाली. देवीने विजयीभव आशिर्वाद दिला. हा विजयाची मुहूर्त मेढ ठरलेला विजयी क्षण म्हणजेच नवरात्री उत्सव महोत्सव दसरा होय...... !

# महात्मा गांधी : चारित्र्य हाच शिक्षणाचा पाया मांडणारे अनोखे व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी



अनुराधा कुलकर्णी
वाडा, जि. पालघर


रविवारी आपण महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली. महात्मा गांधी यांना न ओळखणारे आपल्या देशात कोणीच नसेल ते फक्त भारत देशाचे नेते नव्हते ते जगाचे नेते म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांचे राजकीय सामाजिक, शैक्षणिक विचार अमूल्य आहेत. सध्याच्या प्रचलित शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजीचे शैक्षणिक विचार असणे गरजेचे आहे .स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतामध्ये विविध शिक्षणतज्ज्ञ झाले .भारतामध्ये शिक्षण कसे असावे याबद्दल विचार केला त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा गांधीचा फार मोठा वाटा आहे त्यांनी भारतीय शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल केला पाहिजे याचे विचार मंथन केले . सत्यनिष्ठा ,सत्याचरण , नैतिकता, अहिंसा प्रेम यांच्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. आर्थिक परिस्थिती सामाजिक परिस्थितीमध्ये योग्य शिक्षण कसे असावे याचा विचार त्यांनी केला.

सर्व समाजासाठी शिक्षण वंचित ,दिन दलितांसाठी शिक्षण असावयास पाहिजे. त्यामुळे शोषण विरहित समाज निर्माण होईल. सत्य, अहिंसा निर्भयता, सत्याग्रह हे त्यांचे शिक्षणाचे तत्व होते,. सत्य हेच परमेश्वर द ब्युटीफुल ट्री असे त्यांनी शिक्षणाला म्हटले . जीवनाविषयक व चित्ताला शुद्ध करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते,. शिक्षणाची व्याख्या करताना ते म्हणतात.. माणसाचा शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्ट विकास म्हणजे शिक्षण. नैतिक शिक्षण ज्या शाळेत नाही ती शाळा निरर्थक असते. शिक्षणाने मनुष्य व समाज निर्माण केला पाहिजे. मानवी गुण विकास शिक्षणांनी झाला पाहिजे .मन, हृदय, आत्मा यांचा सामंजस्य पूर्ण विकास होणे गरजेचे आहे. 23 ऑक्टोबर 1937 मध्ये वर्धा मध्ये मारवाडी राष्ट्रीय हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या शिक्षण संमेलनामध्ये त्यांनी बेसिक शिक्षण योजना घोषित केली. या योजनेला वर्धा शिक्षण योजना सुद्धा म्हणतात. त्यांच्या मते निशुल्क शिक्षण अनिवार्य शिक्षण केले गेले पाहिजे.

मातृभाषेतून शिक्षण, स्वावलंबी शिक्षण, जीवनासंबंधी शिक्षण, नागरिक, नागरिकत्व शिक्षण, शिक्षणात अंतर्भाव असावास पाहिजे .व्यक्तिगत शिक्षण महत्त्वाचे आहे पण ते समाजाच्या उन्नतीसाठी असावे. साक्षरता शिक्षणाचा अंत नाही व प्रारंभ नाही ते केवळ साधन आहे .

त्यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी विकासासाठी 3H कल्पना मांडली हेड हार्ट अँड हॅन्ड. शरीर, बुद्धी ,आणि हृदय यांचा समतोल विकास झाला पाहिजे .माणसाचे शरीर मन व चैतन्य यामध्ये सर्वोत्कृष्ट गुणाची अभिव्यक्ती विकास करणे म्हणजे शिक्षण होय .

विद्यार्थ्यामध्ये नागरिकत्व यावे. आदर्श नागरिक निर्माण करण्यासाठी शिक्षण असायला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे. त्यांच्या मते विद्यार्थ्यांना बुद्धीचा विकास केवळ पुस्तकातून त्यांना ज्ञान देऊन होणार नाही. त्यांच्या शरीर अवयवाचा योग्य वापरातून होत असतो. त्यामुळे हस्तकला, हस्तव्यवसाय शिकवले पाहिजे .जे शिक्षण व्यक्तिला स्वतःचा पायावर उभे राहून पोट भरवायचे सामर्थ्य देत नाही ते खरे शिक्षण नव्हे. शारीरिक शिक्षणाला मानसिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे. खराब अक्षर अर्धवट शिक्षणाचे निशाणी समजली पाहिजे.



स्त्री शिक्षणाविषयी सुद्धा त्यांनी अनमोल विचार मांडले आहेत. स्त्रियांना पुरुषाइतकेच हक्क असावेत .स्त्री शिक्षण ही काळाची गरज आहे. मुलाचे शिक्षण हे आईच्या उदरातून सुरू होते. त्यामुळे प्रत्येक स्त्रीने शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण हे ग्रामीण भागात झोपडी पर्यंत पोहोचले पाहिजे. शिक्षणाच्या बाबतीत जात धर्मपंथ उच्च नीचता हे भेद नाहीसे करून सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे.धार्मिक शिक्षणाबद्दल ते म्हणतात शिक्षण हे कोणत्या विशिष्ट धर्माचे नसून सत्याचे दर्शन घडवणाऱ्या सत्य धर्माचे शिक्षण झाले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या धर्माची मूलतत्त्वे माहीत असली पाहिजेत. आत्म्याचा विकास करणे म्हणजे शील बनविणे ,ईश्वरांचे ज्ञान मिळविणे त्यासाठी मुलांना मदत केली पाहिजे .त्याखेरीज इतर ज्ञान व्यर्थ आहे .हानिकारक होण्याचा संभव आहे .मुलांना नीतीची पुस्तके वाचून दाखवावीत शिक्षक हा शिक्षण प्रणालीतील महत्त्वाचा घटक त्यांनी मांनला आहे .शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक असावे .विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकापेक्षा शिक्षकांनी शिकवलेले जास्त लक्षात राहते. आत्मिक शिक्षण सुद्धा आत्म्याच्या कसरतीनेच देता येणार. आत्म्याची कसरत शिक्षणाच्या वर्तनानेच प्राप्त होते. सदासर्वदा शिक्षकाने सावधान राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षा करणे त्यांना कधीच पसंत नव्हते .त्यांनी स्वतःच्या आत्मकथा मध्ये नमूद केले की शिष्याच्या प्रत्येक दोषाबद्दल नेहमी शिक्षकाने आत्मपरीक्षण केले पाहिजे. शिक्षक शिष्याच्या दोषाबद्दल थोड्या बहुत अंशाने जबाबदार असतो.

मात्रभाषेतून शिक्षण, उद्योगी शिक्षण ,नैतिक शिक्षण ,चारित्र्य शिक्षण स्वावलंबनासाठी शिक्षण नागरिकत्वासाठी शिक्षण असे विविध शिक्षणाचे पैलू त्यांनी पाडले आहेत .पण सध्याच्या शिक्षण पद्धतीत याचा कितपत विचार केला आहे हे पाहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर गांधीजीच्या शिक्षणाचे विचार अंमलात आणले पाहिजेत.

**(लेखिका स्वामी विवेकानंद विद्या मंदिर वाडा, जि. पालघर येथे सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ऊसतोड मजुरांच्या जीवनाची रहस्यमय उजळणी..!



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

आधुनिक केसरी

**"गरिबी येऊन घरात घरांच्या भिंती पेटल्या, आयुष्याचा वणवा पिढ्यानपिढीत पेटल्या ".आयुष्याच्या वाटा खुटल्या,येऊन गरिबीच्या घरात पाणउतार झाला स्वप्नांचा उभं आयुष्य खुप झटतोय तरि फरफटीत नेणारी वाट वळून घ्यायला तयार नाही. मुस्क बांधलेल्या गरीबीन मोकळा श्वास घ्यायला जागा ठेवली नाही.ओरबाडणार दारिद्रय घनाचे घाव मारत सुटल. आम्ही गरिबीत जन्माला आलो ही आमची चुकी नव्हती. पण आम्ही गरिबीतच मरणार ही आमची घोडचूक असणार आहे.पिढ्यानपिढ्या आयुष्य ऊसाच्या फडाला दान करणारी ऊसतोडीला इच्छा नसूनही बळजबरीने जाणारी ही बायका-माणस पोटाची खळगी भागवायला आयुष्य पणाला लावणारी ही मजूर लोक यांच्या जिवणाची ही रहस्यमय उजळणी.**

परिस्थितीचे ओले फटके मुक्या मारासारखी सोसावी लागते.वळ दिसत नाही पण आतून त्या वेदना सारख्या-सारख्या खुपत राहतात.
तांडयावर,वस्त्यांवर,पाड्यांवर,हाताला रोजच काम नसल्यामुळे ऊसतोडीशिवाय दुसरा पर्याय उरत नाही.मुकरदमा शिवाय दुसरा कुणी सावकार पैशाचं काम करत नाही.त्यामुळे रोजच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या पोटापाण्याच्या वस्तू घेण्यासाठी मुकरदमाकडून उचल (कामाआधी घेतलेले पैसे ) घ्यावी लागते.त्या पैशाच्या बदल्यात कारखान्याच्या कामाचा म्हणजे ऊसतोडीचा करार बांधावा लागतो. मुलीच लग्न असो, दवाखान्याचा खर्च असो, ट्रॅक्टरचे हप्ते असो ,गाडी बैलांची जोड असो,रोजच्या खाण्या-पिण्याचा खर्च असो,सगळ-सगळ मुकरदमाच्या उचलीतून कराव लागत. मग कारख्यान्याचा पट्टा पडला की,मग हिशोब होतो.आणि आपण केलेल्या धंदयातून उचल घेतलेले पैसे मुकरदमाला व्याजासहित वापस करावे लागतात. उरलेले पैसे आपल्याला मिळतात.पण बऱ्याचदा असं होतं की,शेवटी हिशोब झाला की बाकी मुकरदमाकडे न निघता त्या मजूरांकडेच पुन्हा पैसै फिरतात.मग उरलेल्या पैशाला परत व्याज चालत.परत मजूर करार करतो.आणि मागची थक्कीत बाकी,बाकीला ठेऊन अजून पुढे पुन्हा चालू-चालूत उचल घेतो. आणि याच मागच्या-पुढच्या उचलीच व्याज फुगता-फुगता एवढं फुगायला लागत.की तो मजूर त्या मुरकदमाचा महिनदार –सालदार होऊन बसतो.
एवढं ढोरांसारख काम करुन सुद्धा त्यांच्या वाट्याला अवघे आयुष्य दारिंद्रीच राहते.तेच त्यांचा जुना तोच नव्याने मुडका-तुडका संसाराचा गाडा कसा-बसा ओढत असता.पदरी काहीच नसतं खाऊन-पिऊन बोरोबरी असते.दर वर्षी तेच पुन्हा.आणि पिढ्यांनपिढ्याही तेच चालत.बाप कर्ज न फेडता मध्येच जग सोडून गेला.की मग पोराला कराराला बांधतात.मग बापाचं कर्ज पोराच्या खांदयावर टाकून त्यालाही ऊसतोडीच्या कामाला जुपतात. या ऊसतोड कामगारांच्या आयुष्याला अवघे विश्व दारिद्रीचा जो धब्बा लागला तो "उचल " या अपशकुन कारणामुळे.यात मुकरदम लालेलाल आहे.मजुरांकडून उचलीची परत फेड न झाल्यामुळे त्या व्याजाच्या पैशात पुन्हा त्यांना करारात बांधता येते.जास्त पैसे न खर्ज करता आरद्या पैशात कायमस्वरूपीचा मजूर मिळतो.पुन्हा कारखान्याकडून येणार कमिशन लाखा-लाखात पदरात पडत.कारखान्याकडून नि मजूरांकडून दोन्हीकडून मुकरदमला फायदा मिळतो.मुकरदमांची मोठ-मोठी बंगले गाड्या-घोड्या राजेशाही थाटमाठ असतो. हे सगळं त्यांना मजूरांच्या बळावर मिळत.म्हणजे पैशावाल्याकडे अजुन पैसा येऊ लागतो.श्रीमंत अजून श्रीमंत होत जातो आणि गरिब अजुन गरिब होत जातो.
मर-मर मरुन रातनं दिवस काम करुन या आयुष्यावर जीव चिडतो.आपल्याच घामावर लोक मोठ होतांना पाहून जीव जळतो.मजबूरीमुळे काही बोलता येत नाही नुसत सहन कराव लागत. मुकरदमाच्या पायाखाली मजूरांच दबलेल मुंडक असत.ढवळ्या दिवसात खुलेआम उठून जरी दिसत असलं तरी ते दिसूनही न दिसल्यासारख कराव लागत. चुपचाप मुंग गिळून गुपगुमान ऐकाव लागत.मुकरदम सांगतील तिथ बसाव लागत. ओठावरले शब्द गिळावे लागतात.
जणू कर्माची धोपटी नशिबाला लेपटून भोग भोगायला भाग पडते.सगळेच तांडे-वस्ती-गावे ऊसतोड मजुरांनी टाचून-टाचून भरली आहे.ऊस कामगारांच आयुष्य दिवाळी दसरा आणि सारे सण विसरा अस झाल आहे.ते तिकडच ऊसाच्या फडावर झोपड्यांच्या दाराला भुकेची माळ लावून फडावरच दिवाळी दसरा साजरी करतांना आपल्याला दिसतात.
ओल्या बाळांतींनी आपल्या लहान-लहान लेकरांना घेऊन फडात मर्दांनसारखा कोयता चालवतात. लेकरु पाठीला बांधून वाढ्यांची बैल गाडी जुपतात.संध्याकाळी येऊन पुन्हा बावड्यांवर,विहिरीवर जाऊन पाणी आणून आपल्या नि पोरांन-माणसांच्या पोटाच्या भुकेसाठी भाजी-भाकरी करता.आवरुन-सावरुन रात्रीच्या अकरा बाराला विसावा घेतात.आणि पुन्हा सकाळी चार वाजता लगेच घरातल्या कामांची ,पाण्याची भाजी-भाकरीची आवर-सावर करुन सकाळी सहा वाजताच ऊसाच्या फडात गाड्यात-ट्रॅक्टरात मुळ्या भरायला चालू करतात. अहो यांना माणसं म्हणा की मशिन. थकत-बिकत काही नाही हे .आळस झटकायला त्यांच्या अंगाशी आळस यायला हिम्मत करत नाही.असे हे कष्टाळू लोक त्यांच्या कामा सोबत धावत नाही तर काम त्यांच्या सोबत धावत.काम दम त पण फडातली बाया-माणस दमत नाही.
कष्टाच जोखमीच जिवावर उदार करणाऱ्या ढोर कामाच धाडस करणाऱ्या या ऊस कामगारांचा,मेहनतीच्या बाबतीत कुणीच हात धरु



शकत नाही.हे सगळे पहाडी बाहुबली कामाला घोळून पिणारे माणस आहे.काम यांच्या नादाला लागत नाही. ऊस तोडीच्याच कामाला नाही तर कोणत्याही कामाला फत्तर फोड न्याय देऊ शकतात एवढ सामर्थ्य त्यांच्या मनगटात आहे. जणू त्यांच्या बायका-माणस-लेकरं फत्तर फोड शरिरच घेऊन जन्माला आले की काय असा प्रश्न पडतो. ऊन,वारा,थंडी,पाऊस यांना न जुमानता नुसते अवकाळी काम मड्याला बांधून घेतात.आणि एवढं मेहनतीच काम सहज करून मोकळ होतात.दुखनं-बिखनं त्यांच्या जवळपासही फिरकत नाही.हा चमत्कार जणू आयुष्याने त्यांच्या जिवनाचा सवईचा भागच बनावून टाकला आहे. त्याशिवाय त्यांच जगण कठीण आणि जोखमीच आहे.आज एवढ कष्टांच काम करतांना कदाचित त्यांच्या जीवाला विसर पडला असेल त्यांच्या आयुष्यात फनफननाऱ्या जख्मेचा. नाविलाजामुळे ते सहन करत असणार .ते जरी मनमोकळे बोलत नसले तरी जे हाल दिसताय त्यावरून समजाव त्यांच्या डोळ्यात दिसणाऱ्या भावना वाचून .त्यांनी त्यांच्या मनात खऱ्या भावना लपवून ठेवल्या आहे याचा पडताळा होतो.
या ऊसतोड कामगारांच जीवन या कारखानदारीन कवडीमोलाच करुन टाकलं आहे.रातंन दिवस यातना भोगून ऊस कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नाही.त्यासाठी या ऊसतोड कामगारांना कारखान्यांनी,सरकारनी संरक्षणाच्या मायेची शाल ऊसतोड कामगारांवर मोकळ्या हातांनी पांघरायला पाहिजे अस कोठेतरी मनाला वाटत. त्यांच्या या जिवघेण्या कष्टाच्या कामात त्यांच्यासाठी आरोग्य विमा ,अपघात विम्याची सोय असावी. त्यांच्यासाठी दर महिन्याला घर खर्च म्हणून पगारीच्या स्वरुपात फुल ना फुलाची पाकळी कारखान्याकडून आणि सरकारकडून मिळाला हवी.तसेच त्यांच्या बारक्या-बारक्या पोरांसाठी शाळा,राशन असायला--मिळायला हव. विंचू काट्याच अंधारा-कोंधारात ते ज्या पद्धतीने शेतावर उघड्यावर खोप्या करुन राहतात.त्यांची राहण्याची ही गैरसोय सोईत बदलायला हवी.त्यांचा सगळा संसार उघड्यावर राहतो.त्यात बदल होऊन कारखान्यांकडून त्यांच्यासाठी जेवढे दिवस ते राहणार तेवढ्या दिवसांसाठी निवासस्थानाची सोय व्हायला हवी. याचा कारखानदारिन मोबदला जरी घेतला तरी हरकत नाही पण संरक्षण छत मात्र द्यायला हव.त्याच बरोबर उठसुठ रात्री अपरात्री कामाची मुभा नसावी.दिवस मावळला म्हणजे घरी विसाव्याच स्वातंत्र मिळाव.अशा काही अटींचा ऊसतोड कामगारांच्या शोषणाविरुद्ध एक स्वातंत्र कायदा असावा,ज्यामुळे ऊसतोड कामगारांच्या जिवाला थोडा विसावा आणि जगण्याला न्याय मिळेल.

यानी ऊस कामगारांच जिवन सुरक्षित होईल. त्यांच्या जिवाची जिव घेणी मरमर थोडी हलकी होईल. त्या नव्या कायद्यात त्यांच्या स्वःताच्या जिवापासून ते बायका -पोरांच्या जिवापर्यत जिवन सुरक्षा कवच,कुटूंब आरोग्य सुरक्षा कवच,निवासस्थान सुरक्षा कवच,मासिक राशन योजना कवच, मासिक अर्थसाह्य कवच,मुलांचे शैक्षणिक कवच, कामाच्या वेळेच बंधनही त्या कायद्यात बांधले गेले पाहिजे. आणि त्यांच्या मेहनतीला कवडी मोलाची मिळणारी रक्कम दर वर्षी वाढून मिळावी.असे विविध हक्क,या जिवाच रान करणाऱ्या ऊस कामगारांना मिळाल पाहिजे.पोटासाठी फुकट भावात आपलं आयुष्य कारखान्यांवर उदार करणाऱ्या या ऊसतोड कामगारांची माणूस म्हणून व्यथा समजून घेऊन योग्य न्यायाची आशा ही ऊसतोड कामगार या सरकार कडून करतय. पोटासाठी मेलेल्यांच्या पाठीवर मारा पण पोटाला मारु नका त्यांच्या जीवाला मारु नका.अशा विनवण्या सरकारला कारखान्यांना करतांना दिसताय .कामगार हा पाठिच्या कण्यासारखा असतो.जोवर कणा ताईट आहे तोवर धंदा शाबूत आहे.ज्या दिवशी कणा वाकला त्या दिवशी धंदा बुडला.सगळेच काम मशीन करू शकत नाही.त्यांना ही चालवायला माणूस हा लागतोच.माणसा विना परवडणार हे काम नाही.माणसच हे काम कमी मोबदल्यात करू शकतात.फरफटीत नेणारी उपास मारी फुकट किंमतीत हाडाच पाणी करुन घेती.या ऊसतोड कामगारांची वेगळी जनगणना झाली पाहिजे अस वाटत .त्यांच्या वेगळ्या नोंदी असायला पाहिजे.ऊस कामगारांच जिवन हे कारखान्याच्या चिमणी सारख जळत असणार असत. हे मात्र काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

# केसरसिंहपुऱ्यातील रेणुकामाता



आधुनिक केसरी

राजस्थानचा राजा सरदार करण सिंह यांनी कर्णपुरा स्थापन केला. त्याचा मुलगा केसर सिंह यांनी केसरसिंहपुर स्थापन केला. तर दुसरा मुलगा पदमसिंह याने पदमपुरा स्थापन केला. याच राजपूत राजाने केसरसिंह ने कोर्टामागे असणारी रेणुका माता आणि जवळ असणाऱ्या महादेवाच्या मंदिराची देखील स्थापना केलेली आहे.
साधारणपणे तीनशे वर्षांपूर्वी अहिल्याबाई होळकरांच्या काळात या रेणुका मातेच्या मंदिराची स्थापना झालेली असावी. राजपूत राजा करणसिंह याची शिवावर अपरांपार भक्ती आणि श्रद्धा होती त्याच्या अंतरिक प्रेमामुळे त्याने शिव म्हणून शिवालय आणि शक्ती म्हणजे आदिमाता शक्ती देवता रेणुका मातेचे मंदिर बांधलेले आहे. संपूर्ण मंदिर पूर्वाभिमुख असून त्याची उंची साधारणतः पंधरा फूट आहे .1975 मध्ये सोनईच्या महाराजांनी स्वतःही मूर्ती शेंदूर वर्णीय करून तिला माहूरगडच्या रेणुकामाते सारखाच आकार आणि रुप प्राप्त करून दिले. त्यानंतर सोनई चे आप्पा महाराज यांनी 2003 मध्ये मूर्तीची पुनर्रप्रतिष्ठापना केली.
रेणुका मातेच्या या मंदिराच्या परिसरात त्याच काळात बांधलेले शिवाचे मंदिर आहे त्याच्या बाजूस कैलासवासी माणिकराव वैजनाथराव डोलारे यांनी 1983 मध्ये स्थापन केलेले चिंतामणी गणेशाचे सुंदर मंदिर आहे त्याच्या बाजूला विठ्ठल रुक्मिणीचे देखील खूप सुंदर मंदिर आहे. या सर्व मंदिरातून अतिशय कौशल्य पूर्णतेनं देव देवतांची सुंदर चित्र देखील रेखाटलेली आहेत कवी लेखक चित्रकार गीतकार म्हणून सुप्रसिद्ध असणारे हडको येथील रहिवासी सुरेश मोहिनराज चौधरी यांनीही सर्व पेंटिंग अतिशय कुशलतेने रेखाटलेली आहेत असे मंदिरातील पुजारी यांच्याकडून आम्हाला सांगितले होते. या मंदिराच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सुप्रसिद्ध गायक कलावंत मिलिंद डोलारे यांच्या भक्ती संगीताचे आजपर्यंत अनेक कार्यक्रम या मंदिराच्या माध्यमातून केले गेलेले आहेत.
रेणुका माता मंदिरात नित्य नियमाप्रमाणे पूजा ,अर्चा, लघुरुद्र, अभिषेक, नैवेद्य, आरती, रात्री राजोपचार ,नंतर पंचपदी( भजनांच्या कार्यक्रमाचे आयोजन ) देखील आयोजित केली जाते .नवरात्र उत्सवात विशेष असे कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अश्विन प्रतिपदेपासून ते विजयादशमी पर्यंत उत्सव मंदिरात साजरा केला जातो. प्रतिपदेपासून ते विजयादशमी पर्यंत मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भक्तास तांबुलाचा प्रसादही देण्याचा प्रघात आहे. नित्यनियमाने मंदिरात मध्ये दोन वेळा पूजा आरती केली जाते. मंगळवारी आरती नंतर तांबूल प्रसाद देण्याची प्रथा आहे. नवरात्रात दुर्गाष्टमीला होम पूर्णाहुती देऊन यथासांग पूजन केले जाते. प्रतिपदेपासून अष्टमी पर्यंत सप्तशतीचे पाठ मंदिरात होतात. त्यानंतर दुर्गाष्टमीस होमहवन आणि पूर्णाहुती करून पाठाची सांगता केली जाते. विजयादशमीला पूजा अर्चा नंतर महाअभिषेक करण्याचाही प्रघात आहे. विजयादशमीस रात्री बारा वाजेपासून देवी निद्रिस्त होते ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंत. कोजागिरी पौर्णिमेस सकाळी महाभिषेक पूजा अर्चा केली जाते. सायंकाळी महाआरती





सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

उत्सव देवीचा

करून दिपमाळ प्रज्वलित करण्याची पूर्वपार चालत आलेली परंपरा आजही कायम आहे.
कैलासवासी माणिकराव वैजनाथराव डोलारे यांच्या संकल्पनेतून माहूरगड च्या धरतीवर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्याची परंपरा आजही सुरू आहे या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक कलावंत मिलिंद डोलारे यांच्या भक्ती संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते तसेच अनेक मान्यवर कलाकारांच्या कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्याची परंपरा आजही मंदिरात कायम आहे मंदिराचे पुजारी हे देवीची नित्य नेमाने मनोभावे पूजा करीत असतात.
रेणुकामाता मंदिराच्या संपूर्ण परिसरालाच निसर्गाचा वरदहस्त लाभलेला आहे संपूर्ण परिसर हिरवागार .. विशाल वटवृक्षाची गर्द छाया ..त्याच परिसरात उभी असणारी ही मंदिरे.. शांत ..प्रसन्न.. वातावरण.. मग अशा विलोभनीय वातावरणात येणारे भक्तगण भारावून जातात.. त्यांच्या हृदयातील साऱ्या चिंता दूर होतात .मग सारे भक्तगण आपल्या घरी परततात ते एका शांत ..नी दृढनिश्चयाने .. भक्तीभावाने.. हे बाकी खरे.

# भारतासमोर असलेली आव्हाने



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र. : 7620021396

आधुनिक केसरी

**इंग्रज ,फ्रेंच, डच, पोर्तुगीज, मुगल आणि इतरांनी भारतात व्यापार करण्यासाठी प्रवेश केला आणि भारतातील लोकांचा अभ्यास करून त्यांच्या लक्षात आलं की इथले लोकं फितूर लवकर होतात. स्वतःच्या फायद्यासाठी येथील लोक काहीही करू शकतात . याच गोष्टीचा फायदा घेऊन बाहेरील सत्तांनी भारतात कायमचाच पाय रोवण्याचा प्रयत्न केला. यापैकी इंग्रजांनी भारतावर 150 वर्षे राज्य केले.**

सोने की चिडिया समजल्या जाणाऱ्या या भारताचे बाहेरील सत्तांनी अनेक लचके तोडले. सोने की चिडीया समजल्या जाणाऱ्या भारताचे वेगवेगळ्या बाजूने पंख छाटले गेले. भारताला खिळखिळं करण्याचे काम या बाहेरील सत्तांनी केलं. भारतातून सर्वात शेवटी गेले ते पोर्तुगीज. बाहेरील सत्तापैकी भारताला सर्वात भारी गेले ते इंग्रज. इंग्रजांनी भारतात लोकांवर भरपुर अत्याचार, शोषण केले. भारतातील क्रांतिकारी पेटून उठल्यामुळे तसेच गांधींच्या सत्य, अहिंसा या मार्गामुळे भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाले.

भारत स्वतंत्र झाल्यापासून आतापर्यंत म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या या 75 वर्षांत भारताने अनेक क्षेत्रात गरूड झेप घेतली आहे.

ज्या ज्या क्षेत्रात भारताने गरुड झेप घेतली आहे ती क्षेत्र खालील प्रमाणे आहेत.

**1) शेती**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. भारतातील शेतीला अनेकदा दुष्काळ, वादळं, ढगफुटी,पुर तसेच इतर कीटकांचा प्रादुर्भाव इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. भारत स्वतंत्र झाल्यावरही भारतातील लोकांना लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असताना उपवास पकडावा लागला होता कारण त्या वेळेला अन्नधान्याचा दुष्काळ मोठ्या प्रमाणात होता. अन्नधान्य खूप कमी पडत होतं. त्यामुळे अन्नधान्य शेती या क्षेत्रात स्वातंत्र्याच्या 75 वर्षात मोठं संशोधन करून अन्नधान्याचा हा प्रश्न चांगल्या प्रकारे हाताळण्यात आलेला आहे. आज कोरोनाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यांच्याकडून भारतीय जनतेला स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून दोन वर्ष झाले सतत धान्य वितरित करण्यात आलेले आहे. आपल्या देशात चांगल्या पद्धतीने हरितक्रांती विकसित झालेली आहे.

2) तंत्रज्ञान सुरवातीच्या काळात बातम्या, गाणे, ऐकायचे असल्यास लोकं रेडिओ चा भरपुर वापर करत असायचे. 22 जुलै 1927 पासुन भरतात रेडिओ चा उपयोग केला जात होता. त्यानंतर टी.व्ही.आला. मग संगणक आला. आता स्मार्टफोन आले आहेत. आता 5G येत आहे. सॅटेलाइट कम्युनिकेशन तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्याच्या या 75 वर्षात भारताने विकास केलेला आहे.

**3) शिक्षण** व्यवस्था सुरुवातीच्या तुलनेत स्वातंत्र्यानंतर अनेक शहरात मोठ्या प्रमाणात आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, मेडिकल कॉलेज, इंजीनियरिंग कॉलेज, पॉलीटेक्निक कॉलेज, अनेक ठिकानी विश्वविद्यालयाची स्थापना झाली. शिक्षणाच्या क्षेत्रात सुरुवातीपेक्षा आमूलाग्र बदल झाला .

कुठलाही देश महासत्ता होणार असेल तर त्यामध्ये शिक्षणाची व्यवस्था अतिशय महत्त्वाचे राहते. स्वातंत्र्याच्या आधी कोणाला कायद्याचे शिक्षण घ्यावयाचे असल्यास लोकांना परदेशात जाऊन शिक्षण घ्यावे लागायचे. आता मात्र आपल्या भारतातच लॉ कॉलेज मोठ्या प्रमाणावर स्थापन झाले आहेत. आज छोट्या-मोठ्या खेड्यात सुद्धा शिक्षणाची सोय चांगल्या प्रकारे उपलब्ध करून दिलेली आहे.

**4) सुरक्षा**

स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, आधुनिक तंत्रज्ञान असलेल्या मिसाईलला , लढाऊ विमाने यांना भरपूर महत्त्व दिले आहे. भारत त्यासाठी वेगवेगळ्या देशांकडून मोठ्या प्रमाणात खर्च करून अत्याधुनिक तंत्रज्ञान व लढाऊ विमाने विकत घेत आलेला आहे. भारत सर्वात जास्त खर्च हा सुरक्षेवर करत आलेला आहे. कारण पाकिस्तान व चीन साखे शत्रूराष्ट्र आपल्या देशापासून अगदी जवळच आहेत. रशियाकडून सुद्धा भारत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बऱ्याच गोष्टी खरेदी करते.

**5) इंटरनेट**

भारताने इंटरनेटचा वापर करून मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. आज खेड्यापाड्यात पर्वतीय क्षेत्रात अनेक ठिकाणी चांगल्या पद्धतीने इंटरनेटची सेवा पुरवली जाते.

आधी 3G, 4G होतं , आता 5G आलेले आहे. वाय-फाय आलेले आहे. भारताने इंटरनेटच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.

**6) हवामान खाते**

भारतीय शेती ही निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे . शेतीच्या पिकावर हवामानाचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडतो. त्यासाठी हवामानाचा अंदाज अचूक असणे अतिशय आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज समजला तर शेतकरी शेतीची कामे वेळेवर करू शकतो. आज-काल हवामान खात्याने अचूक अंदाज वर्तवता यावा या दृष्टीने मोठी प्रगती केली आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर हवामान क्षेत्रात अचूक अंदाज घेता यावा म्हणून अवकाशात बरेच उपग्रह सोडले आहेत. भारताने हवामान क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे.

**7) पेमेंट व्यवस्था**

सुरुवातीच्या काळात व्यवहार करत असताना वस्तुविनिमय पद्धत अस्तित्वात होती. त्यानंतर पैशाचा शोध लागला. अनेक वेगवेगळ्या राजे-महाराजांच्या राज्यात अनेक नाणी, शिक्के तयार झालीत. भारतात 1935 साली रिझर्व बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. रिझर्व बँक ऑफ इंडियाने भारतामध्ये नोटांची निर्मिती केली. 1 ,2,5 ,10 ,20 ,50 ,100 500 ,1000, 2000 ,10,000 इत्यादी अनेक नोटा भारत स्वतंत्र झाला तेव्हा पासून भारतात आरबीआयच्या मार्फत छापण्यात आल्या.



नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून जुन्या नोटा बंद करण्यात आल्या. नवीन नोटांची निर्मिती करण्यात आली. ऑनलाइन पेमेंट चालू झाले. अनेक ऑनलाइन पेमेंट वॉलेट निर्माण झाले. भारतात कॅशलेस इकॉनोमी म्हणजे रोकडरहीत अर्थव्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात येऊ लागला. असे अनेक बदल भारत स्वतंत्र झाल्यानंतर या 75 वर्षात झालेले दिसून येतात.

**8) सांस्कृतिक विकास**

भारतीय स्वातंत्र्यानंतर कला, नृत्य, चित्रपट, गाणे, लोक नृत्य इत्यादी क्षेत्राचा भरपूर विकास झाला. कला विकसित करण्यासाठी आज अनेक कॉलेज निर्माण झालेले दिसुन येतात. अनेक ठिकाणी डान्स शिकविला जात आहे. डान्स क्षेत्र भरपूर विस्तारल्या जात आहे. त्यांचे क्षेत्र भरपूर मोठे झाले आहे. चित्रपट सृष्टीचा विकास भारतीय स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणावर झाला आहे. हॉलीवूड, बॉलीवूड मराठी चित्रपट सृष्टी यांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. आजकाल भारतात स्वातंत्र्यानंतरच्या पंचात्तर वर्षात सांस्कृतिक विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

**9) संशोधन**

अन्नधान्य, खते, कीटकनाशके, अंतराळ उपग्रह, संगणक, संदेशवहन, शिक्षण, ऑटोमोबाईल्स, रोबोटिक्स व नववस्तूंची निर्मिती, ग्राहकपयोगी वस्तूंची निर्मिती, टेक्स्टाईल्स, मेडिकल्स इत्यादी अनेक क्षेत्रात स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षांत आमूलाग्र बदल झालेला आहे. अनेक क्षेत्रातील रिसर्च सेंटरमध्ये भरपूर विकास झालेला दिसून येतो.

**10) खाद्यपदार्थ**

भारत देश हा अनेक राज्यांनी मिळून बनलेला आहे. प्रत्येक राज्याचे खानपान खूप वेगवेगळे आहे. खाण्याच्या पदार्थात खूप मोठ्या प्रमाणात संशोधन हे सतत चालूच असते. आजकाल लोकांना नवीन नवीन पदार्थ करण्याची आवड आहे. तसेच अनेक विदेशी पदार्थ भारतातील खाद्यपदार्थांमध्ये समाविष्ट झालेले आहेत. आपण बघत आहोत स्वातंत्र्यानंतरच्या काळात खाद्यपदार्थामध्ये मोठ्या प्रमाणात संशोधन चालू आहे. त्यामुळे या क्षेत्रात प्रचंड सुधारणा घडून आल्या आहेत.

**11) आर्थिक विकास**

भारतात आर्थिक बजेट प्रत्येक वर्षी सादर केले जाते. भारताचे बजेट हे तुटीचे असते कारण भारतात उत्पन्नापेक्षा विकासकांवर जास्त खर्च करण्यात येतो. भारत हे विकसनशील राष्ट्र असल्यामुळे भारताचा अर्थसंकल्प हा तुटीचा राहतो. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासात मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली दिसून येते. भारत हा जगातील महत्त्वाची आर्थिक सत्ता आहे. अमेरिकेला टक्कर देण्याच्या शर्यतीत चीन आपली आर्थिक व्यवस्था झपाट्याने सुधारत आहे. आशिया खंडात चीन ला टक्कर देणारी दुसरी महासत्ता म्हणजे भारत आहे. भारताचा विकास दर सात ते आठ टक्के पर्यंत आहेत. भारतात मंदीचा प्रभाव हा नेहमी कमी राहतो कारण भारतात लोकांची बचतीची प्रवृत्ती राहते. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षांत आर्थिक सुधारणा सातत्याने घडवून आणल्या जात आहेत.

**12) रोजगार**

भारतात सुरुवाती पासून शिक्षणाच्या संदर्भात इंग्रजांनी कायदे करून ठेवले आहेत. भारतात इंग्रजांनी जे शिक्षण चालू केले आहे ते कारकुनी पद्धतीचे शिक्षण चालू केले आहे. आतापर्यंत भारतात युवक शिक्षण घेऊन जास्तीत जास्त बेरोजगार राहले आहेत. त्याला कारकूनी पद्धतीचे शिक्षण जबाबदार आहे. भारतात आता चित्र मोठ्या झपाट्याने बदलत आहे. आताच्या पंधरा ते वीस वर्षात प्रधानमंत्री यांनी युवकांना रोजगार प्राप्त झाला पाहिजे यासाठी अनेक उपक्रम चालू केले आहेत .आज-काल रोजगार मोठ्या प्रमाणावर युवकांना प्राप्त होत आहे.

**भारतासमोरील भविष्यकालीन आव्हाने**

1) बेरोजगारी भारतात स्वातंत्र्यानंतरही 75 वर्ष लोटले तरी बेरोजगारीचा प्रश्न सुटला नाही. भारतात जेव्हा 10 जागा असतात नोकरीसाठी तेव्हा 2,00,000 अर्ज जातात. बेरोजगारीला मोठ्या प्रमाणात कारकूनी पद्धतीचे शिक्षण जबाबदार आहे. भारतात बेरोजगारी अनेक प्रकारची दिसून येते.

**2) लोकसंख्या**

भारताची लोकसंख्या स्वातंत्र्याच्या वेळेस जवळपास 33 कोटी होती. आता मात्र ह्या लोकसंख्येचा आकडा 140 कोटीच्या वर गेलेला दिसून येतो. लोकसंख्येला नियंत्रित करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा भारताला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.

**3) दारिद्रय**

भारत हे विकसनशील राष्ट्र आहे. भारतात 10 टक्के लोकं टाटा, बिर्ला, अदानी, अंबानी सारखे श्रीमंत आहेत. 70 टक्के लोक मध्यमवर्गीय येतात. तर जवळपास 20 टक्के लोक आजही दारिद्र्य अवस्थेत राहतात. दारिद्र्य 100% समूळ नष्ट करणे हे भारतासमोरील मोठे आव्हान आहे.

**4) शिक्षण व्यवस्थेतील बदल**

भारत स्वतंत्र व्हायच्या आधीपासूनच भारतात शिक्षण व्यवस्था ही इंग्रजांनी बनवून ठेवली आहे. त्यांनी अनेक कायदे शिक्षणासाठीचे बनवून ठेवले. भारत स्वतंत्र झाल्यावरही विशेषता 75 वर्षे लोटल्यावरही इंग्रजांनी तयार केलेल्या शिक्षण विषयक कायद्यात मुलीच बदल करण्यात आलेले नाहीत. हेच भारतासमोरिल मोठे आव्हान आहे.

**5) दहशतवाद, आतंकवाद**

भारतात स्वातंत्र्यानंतरही बरेचदा दहशतवादी, आतंकवादी कारवाया घडताना दिसतात. बरेच ठिकाणी बॉम्ब ब्लास्ट होताना दिसतात. दहशतवाद आणि आतंकवाद ही भारताला लागलेली कीड आहे. स्वातंत्र्याला 75 वर्षे उलटून गेली तरी दहशतवाद आणि आतंकवाद या समस्या भेडसावतच आहेत.

**6) आपत्ती व्यवस्थापन**

भारतात स्वातंत्र्यानंतरही पूर, ढगफुटी, आग,चक्रीवादळ इत्यादी आपत्ती येतातच. त्या आपत्तीचे व्यवस्थापन करणे भारतापुढचं मोठं आव्हान आहे. पुर आणि ढगफुटीच्या घटना भारतात मोठ्या प्रमाणात होत आहेत. यात जिवित हानी आणि आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात होते. म्हणून भारतापुढे आपत्ती व्यवस्थापन करणे हे एक मोठे आव्हान आहे.

**7) हवामान बदल**

भारतात सध्याच्या घडीला उन्हाळा, हिवाळा, पावसाळा हे तीनही ऋतू दिसून येतात. या तीनही ऋतूत बरेचदा आपण पाहतो खूप जास्त बदल होतात. हवामान बदलाचा शेतकऱ्यांच्या पिकांवर सर्वात जास्त प्रभाव पडतो. बेमौसम गारा , वादळ या सारखा, पाऊस होतो. **क्रमशः**

# वैशालीची जनपद कल्याणी - आम्रपाली

आधुनिक केसरी

**संभोगागृह अर्थात सभागृह हा काळानुरूप अर्थ बदलत आलेला एकाच वास्तूचा शब्द. स्त्रीसत्ताक गणव्यस्थेत स्त्री ही राज्यकर्ती होती व तिच्यासमोर सभा व समीती भरली जायची. स्वैरसंभोग ही त्या काळाची नैसर्गिक उपज होती. गणवृध्दीसाठी जास्तीत जास्त लेकरे जन्माला घालने हा धर्मपुर्व धर्म होता.इतिहासात आम्रपालीला गणिका म्हटले गेले आहे. ती गणिका म्हणजे गणाची मालकीन, गणाच्या जमिनीचे मापून, मोजून (गणना) करुन आपल्या कुलात समान वाटप करणारी अर्थात गणराज्ञी होय. परंतू आजघडीला पुरूषसत्ताक ब्राम्हणी राजक व्यवस्थेने तिला वेश्या बनवून दुष्ट नेनीवेत ढकलले आहे.आज गणिका म्हणजे वैश्या असा आर्थ लावला जातो. तिने बौद्ध भिख्खुंच्या विश्रांतीसाठी आंब्याचे वन दान दिले होते आणि ती आपला रथ हाकताना राजेराजपुत्रांच्या बरोबरीने हाकायची या अधिकाराने ती मालकीन होती, बंद खोलीतली केवळ उपभोगाची वस्तू नव्हे.वैश्या नव्हे.**

नितीन सावंत
9970744142

वैशाली हा अराजक संघगण होता आणि आम्रपाली त्या संघगणाची नगरवधू होती म्हणजे त्या गणाला लोकशाही मार्गाचा दर्जा बहाल करनारी, तो गण उध्वस्त न होऊ देणारी, त्या नगराचे ऐक्य अबाधीत ठेवनारी ती जनपदकल्याणी होती. स्त्रीसत्तेचे महत्व कमी होत असताना आणि पुरुषसत्ताक राजवटी उभ्या रहात असतानाच्या काळामधील आम्रपाली आहे. म्हणजे तीचा गण वा संघगण लोकशाहीप्रधान आहे, मात्र ती लोकशाही टिकून ठेवण्यास ती निमीत्तमात्र आहे.स्त्रीयांचे गणप्रमुख म्हणून असणारे हक्क आधिकार कमी होण्याच्या काळातील ती मावळतीची गणीका.

या अराजक संघगणात पुष्करणीत पुरुषांना अभिषिक्त सिचन विधीद्वारे गणसभासदत्व मिळविण्याची गरज उरलेली नाही तर ते आता सहज सभासद होतात. येथे मातृसत्ताक व्यवस्था क्षीण झाल्याचे दिसुन येते . परंतु तिचे अवशेष मात्र पहायला मिळतात. जसे महामाया ही एका वनात झाडाच्या फांदिला धरुन प्रसूत झाली. तिने तिच्या गणाच्या पुष्करणी जवळ जावून बुद्धाला जन्म दिला .आम्रपाली सुद्धा आंबवनात पुष्करणीजवळ सापडली म्हणून तिचे नाव आम्रपाली पडले. अनेक राजे राजपुत्रांच्या जेवनाचे आमंत्रण नाकारीत, बुध्द वैशाली गणाची गणराणी आम्रपालीकडे जेवायला गेले ते ती वेश्या होती म्हणून नव्हे तर ती लोकशाही पद्धतीने संघगण चालवण्यास मदत करीत असे म्हणून. अराजक संघगणात जमीन ही एका व्यक्तीच्या मालकीचे नव्हे तर संपूर्ण संघाच्या मालकीची असे म्हणून अराजक संघगणात गणसभासदांच्या परवानगी शिवाय जमीन दान देता येत नसे येथे मात्र आम्रपाली बुद्धाला आंब्याचे वन दान देते म्हणजे गणाची ती जनपदकल्याणी असल्याने तिला तसे करता येते. प्रत्येक स्त्रीसत्तेच्या राज्याची एक वेगळी शेती होती त्यावरून त्या गणराणीची ओळख होई. जसे सिंधू नदीच्या खोऱ्यात निर्ऋती गाळपेराच्या भाताची शेती करे. गोदिवरीच्या किनाऱ्यावर शूर्पणखा सरकती शेती करे तेरणा मांजरेच्या परिसरात तुळजाई कदंबाच्या वनात वास करी आणि गाळपेराच्या भातशेती बरोबर, सरकती शेतीही करे. तर पंचगंगेच्या किनाऱ्यावर अंबाबाई आमराईची मालकीन होती. या आपल्या महान गणराण्या आज कोण्या न कोण्या मार्गाने मिथके बनून दुष्ट - सुष्ट किंवा व्यक्तीगत - सामूहिक नेनीवेत बंदिस्त आहेत.त्यांना या ब्राम्हणीकरनाच्या कैदेतून अब्राम्हणी बहुप्रवाही विधायक भौतीकवादी अन्वेषनाच्या पद्धती वापरून व जानीव नेणिवेच्या तर्कशास्त्राच्या आधारे मुक्त केले पाहीजे. तिचा उद्धार तथागतांनी तर केलाच पण ती पुन्हा एका नव्याने मुक्त झाली मिथकांच्या कैदेतून वैश्येचे उलटे चाक फिरून ती जनपदकल्याणी बनली . ती नगरवधूची उलटीबाजू स्त्रीसत्तेचा वारसा ठरली.याचे श्रेय कॉ शरद पाटील यांना जाते.

# युवकांसाठी आदर्श असणारे व्यक्तिमत्त्व



राहुल मोतियाळे
संपर्क क्र. 8554984151

आधुनिक केसरी

**कोरोना आणि लॉकडाऊनचा सर्वाधिक फटका बसला असेल तर तो रिअल इस्टेट क्षेत्राला बसला आहे. आज शहरात ५० टक्के प्रकल्प आता उभे होत आहेत. पण आता मुळात ग्राहकांकडेच घर-फ्लॅट खरेदीसाठी पैसा नाही. अशा स्थितीत फ्लॅट्सच्या किमती कमी होण्यासाठी मुबलक उपाययोजनांची गरज बांधकाम व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. या व्यवसायचा आणि ग्राहकांच्या मानसिकतेचा लेखाजोखा मांडणारा रिर्पोताज / मुलाखत / साक्षात्कार आजच्या सदर मध्ये युवा उद्योजक - श्री साकेत खोचे यांची मुलाखत. पारंपारिक व्यवसायाची कोणतेही बाळकडू न घेता आज घडीला एक यशाच्या शिखराकडे वाटचाल करत असलेले यशस्वी बिल्डर व्यावसायिक म्हणजे साकेत उदयकुमार खोचे.**

**इतक्या कमी वयात आपण व्यावसायिक क्षेत्रात यश कसे मिळवलं?**

मला लहानपणापासूनच समाजकार्याची अतिशय आवड होती, सर्व सामाजिक उपक्रमामध्ये मी हजर असायचो, त्यामुळेच मला इव्हेंट मॅनेजमेंट मध्ये काम करता आले, आणि नंतर मी बिल्डर या व्यवसायामध्ये उतरलो, या व्यवसायात असताना अनेक लोकांशी माझा संपर्क आल्यामुळे, माझी जी मनापासूनची सुप्त इच्छा होती ती म्हणजे राजकारणाची, तीही पूर्ण झालीय. आजही मी कुठल्या पदासाठी काम करत नाही, मात्र आवाज दिल्यानंतर जेंव्हा हजारो युवा आपल्या पाठीमागे उभा राहतो याचा मला अभिमान आहे. ही आई-वडिलांच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांना पाठिंबा दिला, मात्र स्वबळावर ते राजकारणात आले आणि आपलं स्थान मिळवले, ते म्हणतात मला अनेक पुरस्काराने सन्मानित आहे मात्र हे महत्त्वाचं नाही आपण काय काम करतो, हे अतिशय महत्त्वाचं आहे, पुरस्कार मिळेल म्हणून मी काम नाही करत.. आपण समाजासाठी काही देणे लागतो म्हणूनच मी समाजकारण करतो, आपण समाजासाठी काही देणे लागतो हे लक्षात घेऊन सतत प्रयत्नशील असणारा व्यक्तिमत्व म्हणजे साकेत खोचे अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे, हजारो संख्येने त्याच्यासोबत असलेला युवा वर्ग हे सगळ्यात महत्वाचं म्हणता येईल.

**समाजकार्याची ओढ कशी लागली ?**

खरंतर माझं शिक्षण Bsc होतं मात्र माझी आवड ही व्यवस्थापन इव्हेंट मध्ये जास्त होती त्यामुळे मी सतत सर्वच्या संपर्कआत असायचो, यात अनेक राजकिय सामाजिक आणि व्यावसायिक लोकांच्या भेट होत असे त्यामुळे कळत नकळत मी बिल्डर व्यवसायात आलो आणि काही तरी नाव करावं हा त्यामागचा उद्देश होता, असं म्हटलं तर वावग ठरणार नाही.

**मुलं, पालक, आणि इतर आपल्या मित्रांसाठी काय संदेश द्याल ?**

राज्यावर आलेल्या संकटात आम्ही पहिल्या दिवसापासून सरकारला पाठिंबा देत आलो, तो उद्याही असेल. परंतु आता आमचाही नाइलाज होत आहे.

करोनाकाळात महाराष्ट्रात जवळपास ४० टक्के छोटे व्यवसाय कायमचे टाळे लागले आहे. जी पुन्हा कधीही सुरू होणार नाहीत. यादरम्यान आमच्या व्यवसायाला कोणतीही सवलत मिळाली नाही, मात्र तरीही आम्ही डगमगलो नाही.

**आज तुमच्यादृष्टिने बिल्डर व्यवसायमध्ये प्रमुख आव्हाने कोणती आहेत?**

गेल्या चार-पाच वर्षांत औरंगाबादमध्ये औद्योगिकीकरणाच्या बाबतीत आणि राहणीमान उंचावले आहे, खरंच मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत आणि तरुण पिढी (विशेषतः तंत्रज्ञान अवगत असलेली) पुढे आली आहे. त्यामुळे मराठवाड्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. याचे मुख्य श्रेय बजाज ऑटो, व्हिडिओकॉन यांना जाते, त्यांनी पूरक उद्योगांची साखळी निर्माण केलेली आहे. I पूरक उद्योगांनी यंत्रोपकरणे, मोठ्या यंत्रांचे सुटे भाग यांची पुरवठा साखळी निर्माण केली. दर्जा आणि किंमत यांच्यात समन्वय साधला, निर्यातीला सुरुवात केली आणि मग त्यांच्या लक्षात आलं, आपण कुठेही कमी नाही आहोत.



करोना लॉकडाऊनचा सर्वाधिक फटका रिअल इस्टेट क्षेत्राला बसला आहे. एकट्या मुंबई शहर व उपनगराचा विचार केल्यास ३ लाख कोटी रुपयांहून अधिक प्रकल्पांना फटका बसला आहे. त्यातील ५० टक्के प्रकल्प आता उभे होत आहेत. पण आता मुळात ग्राहकांकडेच घर-फ्लॅट खरेदीसाठी पैसा नाही. अशास्थितीत फ्लॅट्सच्या किमती कमी होण्यासाठी मुबलक उपाययोजनांची गरज बांधकाम व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. या व्यवसायचा आणि ग्राहकांच्या मानसिकतेचा लेखाजोखा मांडणारी मुलाखत

**मुलं, पालक, आणि इतर आपल्या मित्रांसाठी काय संदेश द्याल ?**

राज्यावर आलेल्या संकटात आम्ही पहिल्या दिवसापासून सरकारला पाठिंबा देत आलो, तो उद्याही असेल. परंतु आता आमचाही नाइलाज होत आहे. करोनाकाळात महाराष्ट्रात जवळपास ४० टक्के छोटे व्यवसाय कायमचे टाळे लागले आहे. जी पुन्हा कधीही सुरू होणार नाहीत, आणि जर ते सुरू करायचे असेल तर त्यांना सरकारची मदतच लागेल. यादरम्यान सरकारने अनेक उपाययोजना केल्या, मात्र आमच्या व्यवसायाला कोणतीही सवलत मिळाली नाही, मात्र तरीही आम्ही डगमगलो नाही.

**आज तुमच्या दृष्टिने बिल्डर व्यवसायमध्ये प्रमुख आव्हाने कोणती आहेत?**

माझ्या दृष्टीने आव्हाने खूप मोठी असतात मात्र तुम्ही जर फोकस असाल तर मग आव्हाने मात्र हळूहळू तुमच्या ताब्यात येऊ लागतात याचं साधं उदाहरण मी तुम्हाला सांगू इच्छितो मी इव्हेंट मॅनेजमेंट चे काम करत असताना अचानकपणे माझी इच्छा होती म्हणूनच मी बिल्डर / बांधकाम या व्यवसायात उतरलो प्लॉटिंग बिल्डिंग बांधकाम असे मी काम करत गेलो आणि एक दिवस मी माझी स्वतःची साईटच ओपन केली कमीत कमी किमतीमध्ये कसं घर देता येईल याचा मी विचार केला आणि केवळ एकच वर्षात माझी एक साईट ही पूर्ण झाली त्यानंतर मात्र माझा विश्वास बळावला आणि मी त्यापुढे जाऊन अजून काय समाजासाठी चांगलं करता येईल त्यासाठी पुढे आलो. मी ब्राह्मण समाजाचा आहे त्यामुळे या समाजासाठी मी काय करू शकतो? त्यासाठी मी प्रयत्न केले आणि करतोय. एवढंच नाही तर जवळपास 30-35 ज्या वेगवेगळ्या संघटना होत्या त्यांना एकत्र करण्याचं काम मी केलं. आणि मी पहिले तुम्हाला बोललो मला श्रेय नको. फक्त काम झालं पाहिजे.. या तत्त्वावर मी आजही काम करतो आहे.

गेल्या चार-पाच वर्षांत औरंगाबादमध्ये औद्योगिकीकरणाच्या बाबतीत आणि राहणीमानात उंचावले आहे, खरंच मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत आणि तरुण पिढी (विशेषतः तंत्रज्ञान अवगत असलेली) पुढे आली आहे. त्यामुळे मराठवाड्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. याचे मुख्य श्रेय बजाज ऑटो, व्हिडिओकॉन यांना जाते. त्यामुळे आज औरंगाबाद एक चांगले शहर म्हणून ओळखले जाते. या अगोदर औरंगाबाद शहराची ओळख ही कामगारांचे शहर अशी होते, जसं मी तुम्हाला बजाज आणि व्हिडिओकॉनचं उदाहरण दिलं होतं. असे म्हणणे काही वाईट नाही मात्र मात्र कालांतराने लोकांच्या गरजा बदलल्या त्यांना राहण्यासाठी चांगली वसाहत पाहिजे घर पाहिजे यासाठी मी कमी खर्चामध्ये काय चांगलं करता येईल यावरती काम केलं, आणि स्वस्तामध्ये फ्लॅट्स बांधले त्यांची विक्री केली. हे करत असताना माझ्या हे लक्षात आलं होते की, सर्वसामान्य नोकर वर्ग आणि त्यांच्या कुटुंबासाठी निवाऱ्याची गरज आहे, जे की एमआयडीसी वाळूज midc मध्ये काम करतात या ठिकाणी आपण जर कमी खर्चामध्ये घर बांधून दिली तर त्यांचा विकास होऊ शकतो, हे माझ्या मनात आलं, आणि मी त्यावर काम केलं. म्हणूनच मी माझी पहिली साईट वाळूज एमआयडीत केली, आपण काय देऊ शकतो अशा अनेक बाबीचा मी विचार केला आणि जवळपास एक सुंदर साईटच मी आपल्या शहरातल्या सर्वात लोकप्रिय अशा बजाज या कंपनीच्या मागे ओपन केली. जी कंपनी ही औरंगाबादची ओळख आहे. आणि केवळ वर्षभरातच ती माझी साईट पूर्णपणे विकली गेली आणि मला एक प्रकारचं समाधान मिळालं आणि बळ मिळालं, जेणेकरून मी दुसऱ्या ठिकाणी माझा बिल्डिंग किंवा इतर व्यवसाय करू शकलो, हे सर्वात महत्त्वाचं. मुळातच मी टू बीएचके जो आजचा ट्रेंड आहे, तो केवळ फक्त 10 ते 12 लाखात आणि सोबत बँकेचे लोन पण करून दिले हे विशेष..! एकंदरीतच समाजकारण राजकारण आणि आपलं व्यवसाय जपण्याचं काम आणि एक मोठा आदर्श साकेत खोचे यांनी दिलाय, कमी वयात आपण एक यशस्वी बिल्डर होऊ शकतो आणि आज तब्बल अनेक साईट करू शकतो खरंच युवकांसाठी ही खूप मोठी प्रेरणादायी गोष्ट आहे.

---

# नवशक्तींचे नऊ रंग

## नववा दिवस-रंग व्हायब्रंट गुलाबी!





प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

सृजन हो, जय माता दी! पहाता पहाता आपण नऊ रात्रींच्या शेवटावर आलो. या निमित्ताने मागील आठ दिवसांत दररोज एक नवा विचार मांडण्याचा आणि वाचकांच्या सूचनांचा अंतर्भाव करून चिंतन-मंथन करण्याचा प्रयत्न केला. नऊ शक्तींचे नऊ रंग हे सदर महाराष्ट्रातील अग्रगण्य वर्तमानपत्रांनी त्या दिवसाच्या रंग, शीर्षक, आणि त्या दिवशीच्या अवताराचे चित्र छापून माझे लेखन जिवंत केले त्याबद्दल मी सर्व सन्मानीय संपादक-उपसंपादकांचा ऋणी आहे! तद्वतच माझी आई स्व.सौ. शांताबाई, जिणे मला शिकविले, तसेच माझी सुविद्य पत्नी सौ.विमल, कन्यारत्न कु.डॉ.वैष्णवी आणि महाराष्ट्रातील हजारो ज्ञात-अज्ञात माता-भगिनींनी दररोज लेख वाचून लिहायला प्रेरित केल्याबद्दल या तमाम स्त्री-शक्तींचा मी ऋणी आहे!

नवरात्रोत्सव हा नऊ दिवस चालणारा शक्ती उपासनेचा, अंतर्बाह्य शुद्धीकरणाचा उत्सव! या नऊ दिवसात विविध विचारांचा उहापोह होतांना स्त्रीशक्ती आणि आंतरिक शक्तीला उर्जायमान करण्याचे ध्येय्य साधकात निर्माण व्हावे! हा उत्सव कृषीसंस्कृती आणि मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचे प्रतिक असून हा सृजनत्वाचा सोहळा आहे! श्री देवी म्हणजेच एक शक्ती जी प्रत्येक स्त्री-पुरुषांमध्ये संस्थित असून तिचे अस्तित्व म्हणजेच माणसाचे अस्तित्व आहे! म्हणूनच हे नऊ दिवस शक्ती पूजेचे दिवस असून माणसाने अंतर्बाह्य शक्तिशाली होऊन, षडविकारांवर विजय प्राप्त करून दैनंदिन जीवन समृद्ध करावे यासाठीचा हा उत्सव! शरीरातील सप्तचक्रांवर आपले लक्ष केंद्रित करून ध्यान-साधना करण्याचा हा उत्सव! समाजातील अनन्यसाधारण कार्य करणाऱ्या स्त्री शक्तींचा सुद्धा हा सन्मान सोहळा! स्त्री केवळ उपभोग्य वास्तुप्रायः नसून तिच्यामुळेच संपूर्ण विश्वाचे अस्तित्व आहे याची प्रकर्षाने जाण व्हावी! ती पृथ्वी, धात्री, जगाला आपल्या उदरातून जन्म देणारी जगन्माता आहे!

आजघडीला 'स्त्री हे सर्वोच्च त्याग आणि श्रमाचे प्रतिक आहे' म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही! उर्जा, वात्सल्य, प्रेमांकुर आणि सर्वच काही आहे ती! संसारातून 'ती' वजा केल्यास संसारच उभा राहणार नाही! तिच्याशिवाय सारं काही शून्य! ती म्हणजेच विश्व! असा दैदिप्यमान, अलौकिक स्त्री शक्तींचा नवविचार-सोहळा मागील आठ दिवसांत आपण साजरा केला. हा सोहळा एवढ्या काळापुरता सीमित न राहता हा सन्मान सोहळा नित्य साजरा होऊन ती गर्भापासून ते संसदेपर्यंत सन्मानाने जायला हवी! स्त्री म्हणून तिची उपेक्षा थांबून तिच्या नवनव्या अपेक्षांना नवे धुमारे फुटावेत! आत्तापर्यंत विवाहानंतर स्त्रीच पतीच्या घरी नांदायला जायची, परंतु ज्या दिवशी सहा महिने नवरी पतीच्या घरी आणि सहा महिने नवरदेव पत्नीच्या घरी जाऊन नांदायला लागेल तेंव्हा खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता येईल! दोघेही जेंव्हा सासुरवास भोगतील तेंव्हाच स्त्रीच्या त्यागाची जाण पुरुषाला होईल!

आज शेवटच्या दिवशी श्री देवी सिद्धीदात्री, सर्व सिद्धींची अधिष्ठात्री रूपाने प्रकट होते! संपूर्ण विश्वावर विजय मिळविण्याचे द्योतक म्हणजे सिद्धीदात्री माता! आज साधकाने साधना करतांना सिद्धगन्धर्वयक्षाद्यैरसुरैरमसुरैरपि | सेव्यमाना सदा भूयात् सिद्धिदा सिद्धिदायिनी ||

या मंत्राचा उच्चार केल्यास त्याला 'अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व वशित्वं' ह्या अष्टसिद्धी प्राप्त होतात असा मार्कंडेय पुराणात उल्लेख आहे. आजमातेने व्हायब्रंट गुलाबी रंगांची वस्त्र परिधान केली आहेत. हा गुलाबी रंग म्हणजे आनंदी संसार, सौभाग्य, खुलणे, फुलणे, शांतता याचे प्रतिक आहे. गुलाबी रंग हा प्रेम, आनंद याचे प्रतिक असून प्रेमिकांचा हा आवडता रंग आहे! हा रंग प्रेमाचेच प्रतिक आहे! तेंव्हा, चला या गुलाबी, प्रेमाच्या प्रतीकाने हा नऊ दिवस चाललेला विचारोत्सव-रंगोत्सव तूर्तास थांबवूया आणि पुन्हा भेटू पुढील वर्षी नव्या रंग आणि विचारांसह! ॐ सिद्धिदात्र्यै नमः।

---

# विद्येची देवता सरस्वतीच असून सावित्रीबाई प्रेरणास्थान



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील काहीपुरोगामी मंडळी विद्येची देवता सरस्वती की सावित्री असा विवादित विषय प्रस्तृत करून समाजात फुट पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतात.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या कार्यक्रमात राष्ट्रवादी नेते छगन भुजबळ यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी बोलत असताना त्यांनी देवी सरस्वतीवरुन वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावरुन त्यामुळे राजकीय वर्तुळात आता पुन्हा नव्या वादाला सुरुवात झाली आहे.**



देवी सरस्वतीला कुणी पाहिलं आहे का? असा थेट सवाल भुजबळांनी कार्यक्रमात केला आहे. तसेच पाहिलं असेल तरी फक्त 3% लोकांना सरस्वती देवीने शिकवलं असेल असं देखील भुजबळ म्हणाले. शाळेत सरस्वतीचा फोटो का पाहिजे? शाळांमध्ये फुले, आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटलांचे फोटो लावा अशी मागणी भुजबळांनी केली आहे. श्री सरस्वतीदेवी म्हणजे विद्या आणि कला यांची देवता. तिच्या भावपूर्ण उपासनेने उपासकाची बुद्धी सात्त्विक बनल्याने त्याला विविध प्रकारच्या कला आणि ज्ञान प्राप्त होते. बुद्धीने जे ग्रहण केले ते शब्दबद्ध करण्याचे काम श्री सरस्वतीदेवीचे आहे. श्री सरस्वतीदेवीला संत ज्ञानेश्वरांनी 'अभिनव वाग्विलासिनी' तर श्री समर्थ रामदासस्वामी यांनी 'शब्द मूळ वाग्देवता' असे म्हटले आहे. ही विद्येची देवता आहे. श्री सरस्वती देवीला शारदाही म्हटले जाते.

शारदा म्हणजे ज्ञानाला आधार देणारी. या देवीच्या साडीचा रंग लालसर गुलाबी असतो. विद्याप्राप्तीसाठी श्री सरस्वतीची उपासना आणि प्रार्थना आवश्यक असते. विद्येची देवता सरस्वती आहे हे आपल्या हिंदुस्तानात जवळपास सर्वांनी मान्य केलेले आहे. किंबहुना तशी अनेकांची श्रद्धा आहे. आणि त्यातल्या त्यात हिंदूंची तर ती देवता आहे.त्यामुळे विद्येची देवता सरस्वतीच असून सावित्रीबाई प्रेरणास्थान आहे. पुरोगामित्वाचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात आजवर अनेक महापुरुषांनी योगदान दिले आहे. स्त्री शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान मोठे आहे. सावित्रीबाई फुले, भारतातील पहिल्या महिला शाळेची पहिली महिला शिक्षिका होत्या. त्या झ एक अग्रणी व्यक्ती आहे. प्रबळ जातीव्यवस्थेविरुद्ध त्यांनी निर्भयपणे लढा दिला आणि उपेक्षित लोकांच्या उन्नतीसाठी कार्य केले.सर्व महिलांच्या सन्मानाची मागणी केली, यासाठी त्यांनी पती ज्योतिराव फुले यांच्यासह आयुष्यभर काम केले. त्यांच्या दृष्टीने मानवता, समानता, स्वातंत्र्य आणि न्याय ही तत्वे अत्यंत महत्त्वपूर्ण होती. ज्या काळात स्त्रिया केवळ वस्तू होती, त्यांनी एक स्पार्क पेटविला ज्यामुळे शिक्षणात समानता निर्माण झाली – जे अशक्य होते जे यापूर्वी अशक्य होते. स्त्रियांवर लादलेल्या भेदभाववादी सीमांच्या विरोधात जोरदारपणे भाष्य केले ज्यामुळे त्यांच्यावर अत्याचार होऊ लागले. भारतातील सामाजिक मुक्तीसाठी धर्मनिरपेक्ष शिक्षणावर त्यांचा भर होता. हा त्यांच्या महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा आहे. त्यांनी संघर्ष आणि कष्ट समजून घेऊन अधिक चांगले ज्ञान घेऊन आपण अशा जीवनाकडे पहात आहोत ज्याने केवळ भारतातील शिक्षणाचा चेहराच बदलला नाही, तर मानवतेला खऱ्या अर्थाने प्रबुद्ध केले.त्यामुळेच सावित्रीबाई फुले या विद्येचे प्रेरणास्थान आहे.

# चिखला-पाण्याचा तुडवीत रस्ता शाळेला चल माझ्या दोस्ता




आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** सरकारच्या नजरेत जीव आपला सस्ता, आपण किती बी खाल्ल्या कस्ता, तरी सरकार दंग आहे त्यांचाच बांधण्यात बस्ता, माहीत नाही कधी होईल आमचा रस्ता, मायबाप आमचे खाऊन रात-दीन खस्ता, आम्ही शिकून मोठे व्हावे म्हणून आम्हां दाखविती शाळेचा रस्ता, त्यांच्या मनाची पाहून अवस्था, आम्ही ऐका दशकापासुन तुडवीत हा रस्ता, जवळ करतोय शाळेचा रस्ता, माहित नाही आजून किती दिस खाव्या लागतील खस्ता, तरीपण आपण शाळेत जाऊ बर दोस्ता.....!

अशा अत्यंत हालआपेष्टा भोगत केज तालुक्यातील मौजे केकतसारणी गावाला गेल्या ऐका दशकापासुन रस्ताच नाही. अलीकडच्या सात-आठ वर्षांपासून तर कच्चा-मच्चाही रस्ता नसल्याने येथील विद्यार्थी बारा महिने हा रस्ता तुडवत आपल्या आई-वडिलांच्या आणि स्वतःच्या स्वप्नातील भविष्यासाठी शाळेत जाताहेत.

विशेषतः दरवर्षी पावसाळ्यात तर जीवघेणी कसरत करत शिक्षण शिकत असताना पं.स-जि.प. अध्यक्ष-उपाध्यक्ष, शिक्षण-बांधकाम सभापती-उपसभापती, आजी-माजी आमदार-खासदार, पालकमंत्री, विधानपरिषद आमदार, राज्यसभा खासदार यांच्यासह जिल्हयाचे जिल्हाधिकारी आणि जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पैकी कुणालाही आजपर्यंत हा केकतसारणी गावाचा रस्ता, येथील विद्यार्थी-गावक-यांची दयनीय अवस्था नजरेस पडली नाही का......? यापैकी कुणाच्याही कानावर हे गा-हाणे गेलेले नाही का......?? लोकांच्याच मतावर मस्ती करणारे हे छोट्या-मोठ्या स्तरातील लोकप्रतिनिधी आणि जनतेचे नौकर असणारे हे IAS अधिकारी आपले समाजाप्रतीचे दायित्व विसरतातच कसे......??? यांच्यावरही अत्यावश्यक सेवेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याच्या अनुषंगाने का गुन्हे दाखल करण्यात येत नाहीत....???? जसे सेवाशर्तीचे उल्लंघन केले म्हणून कर्मचारी-अधिकारी निलंबित केले जातात. तसे आपापल्या मतदारसंघात सामाजिक-स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले म्हणून चार-सहा महिने आमदार-खासदार, पालकमंत्री यांचेही निलंबन का....का होत नाही......?????

विधीमंडळ, संसदेत गोंधळ घातला म्हणून अनेकवेळा निलंबन केलेले दिसुन येते. मग आपल्या मतदारसंघातील या अनागोंदी गोंधळा बाबतीत का काहीच कारवाई केली जात नाही.......?????? असे असंख्य प्रश्न या केकतसारणी रस्ता प्रकरणाच्या अनुषंगाने पडत आहेत. केज तालुक्यातील बजरंग सोनवणे हे बांधकाम-शिक्षण सभापती राहुनही प्रश्न प्रलंबित कसा.....?? आस म्हटलं जातं की, बजरंगाची कमाल...हमाल दे धमाल.....! परंतु केज बाबतीत मात्र हे असफल ठरल्याचेच संबंधित वास्तव्यावरुन दिसुन येत आहे. बजरंग सोनवणे हे विद्यमान जि.प.उपाध्यक्ष असुन ते ऐक मोठे गुत्तेदारही आहेत. तरीही असे प्रश्न सुटत नाहीत हे नवलच.......! मग काय ही अशी मंडळी व यांच्यावरील पांढरपेशी लोकप्रतिनिधी-अधिकारी काय केवळ स्वतःचे उखळ पांढरे करण्यासाठीच आहेत का......?? तेंव्हा आता तरी या प्रश्नाची दखल घेऊन गावातील विद्यार्थ्यांसाठी-देशाच्या उद्याच्या भविष्यासाठी झोपेचे सोंग घेतलेल्यांपैकी कुणाला तरी पाझर फुटेल का....? आणि केकतसारणी गावाचा रस्त्याचा प्रश्न मिटेल का.....?? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल......!!



# नवदुर्गा उत्सवात ऊर्मिलाताई पवार यांच्या हस्ते पैठणी साड्या बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** नवदुर्गा गरबा उत्सव जल्लोषात साजरा होत असून श्रीराम कॉलनी आयोजित मंडळात भव्य दिव्य गरबा दांडिया उत्सवाला महिला भगिनींचा व तरुणाई या मंडळात नवरात्रौत्सवानिमित्त मोठ्या उत्साहात दांडिया खेळण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. चौदा वर्षांपासून विविध उपक्रम राबवत नवदुर्गा उत्सव समिती मंडळाच्या वतीने पुन्हा एकदा कोरोनानंतर यंदा नवरात्रौत्सवाची गरबा, दांडियाचे यशस्वी आयोजन करून महिलांसाठी एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. मोठ्या आनंदात कन्नड शहरातील महिला व तरुणी पारंपारिक पोशाख घालून दांडिया खेळण्याचा आनंद घेत आहेत. या मंडळाच्या वतीने रोज विविध उपक्रम राबविले जातात तसेच दांडिया खेळण्यासाठी येणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येक दिवशी बक्षीस स्वरूपात पाच पैठणी साड्या महिलांसाठी लकी ड्रॉ पध्दतीने काढले जातात तसेच इतर पंधरा बक्षीस तरुणी व लहान चिमुकल्यांना देण्यात येते, अशी माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष केतन त्रिभुवन व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ. मनोज राठोड यांनी दिली आहे. यावर्षीच्या दांडिया खेळणाऱ्या स्पर्धकांना दिले जाणारे सर्व बक्षीसे युवा उद्योजक मनोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योजिका ऊर्मिलाताई पवार यांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप करण्यात येत आहे.

या नवरात्र उत्सवासाठी मारुती काका राठोड, राहुल राठोड, सोमनाथ वायडे, कैलास वैष्णव, अतुल वाणी, अनिल खंबाट, सत्यजित आव्हाड,जितू घुगे, संतोष राठोड, योगेश त्रिभुवन, जीवन बेडवाल, नितीन राठोड, कुणाल दाभाडे, आकाश बोलधणे, टिलकचंद चव्हाण, प्रदीप उदार, विशाल बोर्ड, सचिन हीरे, राहुल राठोड, ऋशिकेश सुरवाड, अक्षय सोनवणे, अमर राठोड, दीपक जाधव, निखिल म्हस्के, दीपक शिंदे, अमोल काथार यांची उपस्थीती होती .

# छावा जिल्हाप्रमुख मनोज पाटील मुरदारे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** छावा मराठा युवा संघटनेचे छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रमुख मनोज पाटील मुरदारे यांच्या वाढदिवसानिमीत्त सामाजिक उपक्रम राबवुन वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये रक्तदान शिबीर घेऊन २६ रक्तदात्यांनी रक्तदान केले, बिडकीन ग्रामीण रूग्णालयात रूग्णांना फळ वाटप केले, अंगणवाडी क्र.१,६,९,१७ यामध्ये चिमुकल्यांना खाऊ वाटप, शालेय साहित्य करून वृक्षारोपन केले. टाकळी अंबड येथिल प्रवाह अनाथालयात जिवनावश्यक वस्तु देण्यात आल्या. यावेळी नागरिकांनी मनोज पाटील मुरदारे यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी जि.प.सदस्य विजय चव्हाण, झुंजार छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील कोटकर पाटील, अ.भा.छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक मोरे पाटील, शिवसंग्राम संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष सचिन मिसाळ, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष रमेश गायकवाड, जिल्हाध्यक्ष नंदू गरड, मनसेचे शहर सचिव राहुल पाटील,नगरसेवक फेरोजभाई सय्यद, आस्लमभाई सय्यद, मधुकर सोकटकर, सागर फरताळे,अशोक टेके, मनोज पेरे, रियाजुद्दीन इनामदार, काकासाहेब टेके, सचिनदेवा जोशी, विलास औटी, छावा संघटनेचे युवक जिल्हाप्रमुख किरण काळे पाटील, नवनाथ चौधरी, संतोष कुशेकर, करिमभाई, अनिल संदनसे, नारायण नरवडे, नवनाथ पाटील चौधरी आयुब शेख, गफूर सय्यद, विष्णू मोगल, विजय शेळके, धनंजय चिरेकर, पिनू मुरदारे, नरहरी उबाळे, विलास औटी, नारायण नरवडे, बंडू ठाकूर, अनिल संदनसे, नितीन गरड, गजानन पवार, सोमनाथ कराडकर, सोपान शेंगुंळे, भगवान शिंदे, सय्यद बाबा, दत्तू मामा वैद्य, विजय गजरकर, सोमनाथ जंगम, रेवन लोणकर, अर्जुन एरंडे, सनी शिंदे, दिपक शिंदे, चंदू चाबुकस्वार, यांच्यासह आदींची उपस्थीती होती.



# मुलीचा बळी घेणाऱ्या ट्रॅक्टर, जागा मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करा : एकलव्य संघटना

आधुनिक केसरी न्यूज

**बहिरगाव :** राष्ट्रीय महामार्गाजवळील बहिरगाव - डोणगाव रोडलगत अवैधरित्या मुरूम उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या वाहनाखाली चिरडून आदिवासी समाजातील श्रद्धा पिंपळे या शाळकरी मुलीचा बळी गेला. या घटना घडून आठवडा उलटूनही दंडात्मक कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी तात्काळ सर्वच ट्रॅक्टर, जेसीबी व जागा मालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी एकलव्य संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते यांच्याकडे केली आहे. कन्नड तालुक्यातील बहिरगाव - डोणगाव रोडलगत टेकडीवर जेसीबीने उत्खनन करून मुरूम, दगडाची चोरी करण्यात येते. २३ सप्टेंबर रोजी १३ वर्षीय शाळकरी मुलीचा बळी गेला. दरम्यान उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते व तहसीलदार संजयवारकड यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन उत्खनन झाल्याची पाहणी केली. मात्र या घटनेला आठ ते दहा दिवस उलटून गेले तरी साधा दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव सुद्धा उपविभागीय अधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेला नाही. गौण खनिज माफियांना पाठीशी घातले जात आहे. संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गौतम शिरसाठ, शिवाजी गायकवाड,एकलव्य संघटनेचे तालुकाध्यक्ष जंगलू वाघ, संतोष मोरे, दत्तू राठोड, संजय सोनवणे, अंबादास मोरे, कैलास पवार, निलेश पवार, आकाश पवार आदींनी या निवेदनातून केली आहे.

# मंत्रालयातील फलकावरून काढलेली गाडगे महाराजांची दशसूत्री पुनर्स्थापित करा



आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**नांदुरा :** जगाला विज्ञानवादाचा संदेश देणारे, समाजसुधारक, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची दशसूत्री विचार असणारा फलक १२ मार्च २०२० रोजी तात्कालीन सरकारने मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर लावलेला होता,त्या फलकावर पुन्हा गाडगे महाराजांची दशसुत्री तात्काळ पुनस्थापीत करा या मागणीचे निवेदन संभाजी ब्रीगेड नांदुरा च्या वतीने तहसीलदार नांदुरा यांचे मारफत मुख्यमंत्र्यांना दोन ऑक्टोबर रोजी दिले. गाडगे महाराजांचे मानवतावादी विचार सर्वांना प्रेरणा देत आहेत. सरकारचं कामकाज लोकहितासाठी, निस्वार्थीपणे चालावे हा त्यामागील हेतू होता . गाडगेबाबांची ही दशसूत्री म्हणजे जनतेची सनद व मानवतेचा जाहीरनामाच आहे. मंत्री आणि मंत्रालयात येणाऱ्यांनी संत गाडगेबाबांच्या विचारांची प्रेरणा घेऊन त्यापद्धतीने राज्याचा कार्यभार चालवावा हा त्यामागील प्रामाणिक हेतू होता.परंतु लोकहिताची कायम प्रेरणा देणाऱ्या संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा फलक वर्तमान सरकारने मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावरून काढून टाकला.ही निंदनीय व निषेधार्ह बाब आहे.

यामुळे महाराष्ट्रातील जनता, परिवर्तनवादी संघटना व वारकरी यांच्यामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. लोकांच्या भावना दुःखावल्या आहेत.

समाजसुधारक, कर्मयोगी संत गाडगेबाबांचे कार्य हे साऱ्या जगाने आदर्श घ्यावा असे प्रेरणादायी आहे. त्यांनी अनाथ, अपंगांची सेवा केली. शाळा, अनाथ आश्रम, रुग्णालय, धर्मशाळा बांधल्या. स्वतःच्या गाठीला एक रुपयाही न ठेवता पैसा समाज हितासाठी लावला. गोर गरिबांच्या मुलांना शिक्षणासाठी मदत केली. लोकांच्या डोक्यातून बुरसटलेल्या विचारांची मशागत करून विज्ञाननिष्ठ विचारांची पेरणी केली. लोकांनी निर्व्यसनी रहावे , चोरी लबाडी करू नये याची शिकवण दिली. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, रोजगार, गरीब मुलां-मुलीचं लग्न वगैरे यावर काम करावे असे त्यांनी आपल्या दशसूत्री विचारातून प्रबोधन केले.

हीच दशसूत्रीआपल्या सरकारला मान्य नाही असे चित्र निर्माण झाले आहे. काढलेला फलक पुन्हा त्याच ठिकाणी लावावा ही आमची मागणी आहे. दशसूत्रीच्या फलकाची पुनःस्र्थापना तत्काळ करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेड नांदुराच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. यावेळी संभाजी ब्रिगेड नांदुरा तालुकाध्यक्ष अमर रमेश पाटील, तालुका उपाध्यक्ष दिलीप कोल्हे, तालुका संपर्कप्रमुख सचिन गणगे, तालुका उपाध्यक्ष सचिन बाठे, नांदुरा शहराध्यक्ष हिमांशू अवचार, शहर उपाध्यक्ष कुलदीप डंबेलकर, गजानन राजपूत, राहुल पाटील, कैलास काटे, अशोक कोल्हे, अरुण कोल्हे, नागोराव कोल्हे व इतर उपस्थित होते.

# सोमवारी आझाद मैदानावर महावितरण ऑपरेटर्सचे धरणे!

## संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये, सरचिटणीस नवनाथ पवार यांनी दिली माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणमधील ऑपरेटर कर्मचारी उच्च वेतन वाढीच्या मागणीसह उपकेंद्रांच्या इतर मागण्यांसाठी आझाद मैदान मुंबई येथे १० ऑक्टोबर पासून धरणे आंदोलन करणार आहेत. हा प्रश्न १६ वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर महावितरण प्रशासन सातत्याने वेळ काढू पणा करीत आहे. अनेक सरकारे बदलली, परंतु प्रश्न सुटले नाहीत. प्रश्नांची दखल घेत नसल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत ऑपरेटर्स संघटनेने लोकशाही मार्गाने धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यानिमित्ताने राज्यभरातील महावितरण ऑपरेटर्स कर्मचारी आझाद मैदान मुंबई येथे १० ऑक्टोबरला प्रचंड धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती औरंगाबाद येथे आज झालेल्या पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये, सरचिटणीस नवनाथ पवार यांनी दिली. यावेळी संघटनेचे कोषाध्यक्ष राजेश्वर क्षीरसागर, लक्ष्मण वाघ, महादू कड आदींची उपिस्थती होती.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, सन २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे तीन कंपन्यांमध्ये विभाजन झाले. एक सूत्रधार कंपनी म्हणून या तिन्ही कंपन्यावर नियंत्रक म्हणून काम करते. मंडळ विभाजनापूर्वी ३३ के. व्ही. उपकेंद्रात काम करणारे ऑपरेटर्स बढतीने अतिउच्च दाबाच्या उपकेंद्रात जात होते. परंतु मंडळ विभाजनानंतर अतिउच्च दाबाची सर्व उपकेंद्रे महापारेषण कंपनीत समाविष्ट करण्यात आल्यामुळे ३३ के. व्हि. उपकेंद्रांच्या ऑपरेटरचे पदोन्नती चॅनल नष्ट झाले. मंडळ विभाजन करताना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात कोणत्याही पदाचे वेतन, भत्ते, पदोन्नतीवर विभाजनाने कोणताही परिणाम होणार नाही, असे नमूद केलेले असूनसुद्धा ऑपरेटर कॅडर वर आर्थिक अन्याय होत आहे. उशिराने व कमी वेतनाच्या पदावर सध्या ऑपरेटरांना पदोन्नती देण्यात येते. याशिवाय नोकरीस लागताना समान मूळ वेतनाच्या पदावरील कर्मचाऱ्यांपैकी तांत्रिक कर्मचाऱ्यांना पहिल्या जि. ओ. नंतर कमी वेतन दिले जावे, अशी मानवनिर्मित वेतन तफावत करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता ज्या कामात जास्त धोका असतो, ते काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन व इतर भत्ते जास्त असतात. परंतु महावितरण मध्ये नेमके याच्या उलट आहे. धोकादायक काम करणाऱ्या ऑपरेटर व तांत्रिक कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन कमी आहे. तर खुर्चीवर बसून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत जास्त पगार मिळतो. असा दुजाभाव कंपनीकडून करण्यात येत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या सर्व कारणांमुळे तांत्रिक कामगरांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत ऑपरेटर्स संघटनेने गेली पाच वर्षे वीज प्रशासनासह, ऊर्जामंत्री व मुख्यमंत्री कार्यालयात सातत्याने पत्र व्यवहार करून न्याय देण्याची मागणी केली होती. परंतु प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने संघटनेने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या धरणे आंदोलनात संघटनेचे केंद्रीय पदाधिकारी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य, महाराष्ट्रभरातील ऑपरेटर्स, तांत्रिक कर्मचारी, सहाय्यक कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून या धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये, उपाध्यक्ष विश्वास साळुंके, कार्याध्यक्ष सुधीर इंगळे, उपसरचिटणीस खेमराज तिवाडे, उपसरचिटणीस राजेश बडनखे, कोषाध्यक्ष राजेश्वर क्षीरसागर, महेश अहिरे, रामनाथ नागरगोजे, सादिक शेख, नितीन सोनकुसरे, माधव गोरकवाड, लक्ष्मण वाघ, महादू कड, प्रफुल्ल शेरकी, यशवंत गंबरे, सुनील बोयनर, राजेंद्र कुंभार, अशोक भुसेवार, हरिदास नागरे, कु. शितल शिवपुजे, किरण पोवार, आनंद कोटकर या केंद्रीय कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

तत्कालीन वीज मंडळात एकाच दिवशी नोकरीस लागलेले, एकाच वयाचे, एकाच कॅटेगरीच्या दोन ऑपरेटर पैकी जो आजच्या महापारेषण कंपनीत जाऊ शकला, त्याचे वेतन तब्बल १८ ते २२ हजार रुपयांनी जास्त आहे . हा फरक वर्षा गणित वाढत जात आहे . त्यामुळे महावितरण मधील ऑपरेटर वर्गाचे प्रचंड आर्थिक शोषण होत आहे . हक्काची उच्च वेतनाची पदे नष्ट केल्यामुळे व पदोन्नतीची पदे निर्माण न केल्यामुळे हे आर्थिक नुकसान होत आहे .

**कंपनीचे खाजगीकरण धार्जिणे धोरण**

१ एप्रिल २०१९ नंतर कार्यान्वित करण्यात आलेल्या सर्व नवीन उपकेंद्रात केवळ कंत्राटी ऑपरेटर भरण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे . ज्यामुळे कायम ऑपरेटरच्या पदोन्नतीच्या जागा कमी झाल्या असून आतापर्यंत २१० उपकेंद्रे खाजगी कंत्राट दाराकडून चालविण्यात येत आहेत . कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली उपकेंद्रे खाजगी कंत्राटदारांना चालवायला दिल्याने औद्योगिक सुरक्षा धोक्यात आली आहे . कंपनीच्या खाजगीकरण धोरणांमुळे कर्मचारी वर्ग प्रचंड नाराज आहे .



# सोमनाथ खराडे यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** जिल्हा परिषदेकडून आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सोमनाथ खराडे यांना आदर्श ग्रामसेवक म्हणून त्यांची निवड झाली. जिल्हा परिषद औरंगाबादचे मावळते मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटणे व नवनिर्वाचित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. सोमनाथ खराडे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील होते 2008 साली त्यांची नियुक्ती पैठण तालुक्यातील पोरगाव ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक म्हणून झाली. त्यानंतर त्यांनी पैठण तालुक्यातील दरेगाव, फारोळा पारुंडी, ग्रामपंचायतची काम त्यांनी पाहिले. 2017 साली परत त्यांची पोरगाव ग्रामपंचायत या ठिकाणी नियुक्ती झाली. पोरगाव ग्रामपंचायत या ठिकाणी काम करताना त्यांनी पोररगाव गावाचे रूप त्यांनी बदलून टाकल. जल जीवन मिशन अंतर्गत गावामध्ये पाणी पुरवठयाची पाईपलाईन करून घरोघर नळाचे पाणी त्यांनी पोहोचवले. ज्या लोकांना राहण्यासाठी घर नव्हते अशा लोकांना रमाई आवास योजना. पंतप्रधान आवास योजनेतून घर उपलब्ध करून दिले. दलित वस्ती सुधार योजनेतून दलित विकास केला. रोजगार हमी योजनेतून गावात त्यांनी अनेक प्रकारचे उपक्रम राबवून. गावाचा त्यांनी चोमुखी विकास केला. त्यांनी केलेल्या विकास कामामुळेच आज पोर गावची विकसित गाव म्हणून तालुक्यात गणना केली जाते. त्यांनी केलेल्या या सदर कामाची दखल घेऊन त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदरील पुरस्कार मिळाल्यानंतर सोमनाथ खराडे यांचे पोरगाव चे सरपंच दत्ता रंगदल. इंगोले साहेब, प्रभाकर निळ, तात्या पाटील नलावडे, पोरगावचे ग्रामपंचायत सदस्य अशोक गायकवाड. ज्ञानेश्वर भालेकर, गिताबाई भालेकर. समाधान गायकवाड, शंकरराव पाटील, निळ शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पीएच.डी. पदवी मिळाल्याबद्दल फैयाज इनामदार यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जानकर वस्ती शाळेचे आदर्श उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षक श्री फैयाज इनामदार यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल व शिक्षक पतसंस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा रामभाऊ जोशी हायस्कूलच्या मुख्याध्यापक हेमंत कदम सर सेवानिवृत्त शिक्षक पडदुने सर यांच्या हस्ते व आदर्श उपक्रमशील शिक्षक श्री नागनाथ घाटुळे सर शरद गावडे सर अक्षय धोत्रे, आशिष इदाते, मंदार उकरंडे, शार्दुल गावडे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील कारकिर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जानकर वस्ती हे शिक्षक शाळा त्यांनी तालुक्यामध्ये आदर्श बनवले असून नावारूपाला आणलेले आहे. शिक्षणाचा उपयोग विद्यार्थी व शाळेसाठी करत त्यांनी उच्च शिक्षण एम.ए., बी.ए., पीएच.डी. पूर्ण केले आहे पुढील कारकिर्दीसाठी सर्व मित्र परिवाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



# कमी पटसंख्येचे कारण देत शाळा बंद करण्याचा घाट : लोकजनशक्ती पार्टी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** विद्यार्थी संख्या कमी असल्यास संबंधित शाळा बंद करण्याचा नुकताच घेतला गेलेल्या निर्णया विरोधात अंबाजोगाई येथे उपजिल्हाधिकारी यांना संबंधित निर्णय अत्यंत चुकीचा व घातक असुन तो मागे घेण्यात यावा अशा आशयाचे ऐक निवेदन लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने देण्यात आले.
शिक्षण हक्क कायद्यातील कलम 4 नुसार वस्तीतांडा-पाडा एक किलोमीटर अंतरावर पाचवी पर्यंत आणि तीन किलोमीटर अंतरावर आठवी पर्यंतचे शिक्षण मिळाले पाहिजे. दुसरीकडील तथा दुस-या गावच्या शाळेत जाताना कुठे वाटेत घनदाट जंगल, दाट झाडी, ओढे -नदी-नाले, महामार्ग रस्ते-रेल्वेरूळ, खडी , काटेरी झाडे-झुडपे असतात. डोंगराळ भागात मुसळधार पाऊस कोसळत असल्यास शाळेसाठी दूर अंतरावर जाणाऱ्या मुलांचे पाऊस थांबून पाणी निर्वाळेपर्यंत शिक्षण थांबेल. विशेषतः 6 ते 14 वयोगटातल्या मुलांना तीन किलोमीटर पेक्षा जास्त अंतर चालायला लावू नये असे सर्वोच्च न्यायालयाने 8/9/ 2017 रोजी दिलेल्या एका निकालात म्हटले



आहे. आदिवासी वंचित बहुजन आणि दलित मुलांना शिक्षणाचा अधिकार नाकारला जाईल. शिवाय अलीकडच्या काळात वय विनयभंग, बलात्कार असे प्रकार वाढत आहे. असे जर काही अनुचित प्रकार झाले तर शाळाबाह्य मुलांची संख्या वाढेल. पालक मुलींनाच काय मुलांनाही शाळेत पाठवण्यास धजावणार नाहीत. मग यामुळे बालमजुरी आणि मुलींचे बालविवाह वाढतील, अशीही भीती वाटते. तेंव्हा शाळा बंद करणे म्हणजे संविधानाची पायमल्ली केल्यासारखे होईल. तरीही मा.मुख्यमंत्री महोदयांना उपजिल्हाधिकारी साहेब अंबाजोगाई यांच्यामार्फत रीतसर निवेदन देण्यात येत आहे यावरही शासनाने जर शाळा बंद केल्याच तर मात्र लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने संपूर्ण मराठवाड्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष राजेश व्हावुळे यांच्या आदेशानुसार देण्यात आले आहे. यावेळी लोकजनशक्ती पार्टीचे विद्यार्थी तालुका अध्यक्ष आदित्य चौरे, शहर अध्यक्ष प्रदीप गुंडरे, दिनेश घार, टिल्लू जोगदंड, करण मोरे, अविनाश वाघमारे, निखिल कांबळे व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कारागृहात कैद्याने घेतली फाशी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा कारागृहात एका कैद्याने शौचालयात गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पहाटे घडली. जामसिंग जसमल पावरा असे त्या कैद्याचे पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ३ रोजी पहाटे ३ वाजता धुळे जिल्हा कारागृहातील बॅरेक नं .२ परिसरात शिपाई गस्त घालत असताना कैदी सलमानखान सलीमखान व गणेश प्रवीण सोनार यांच्यासह इतरांनी आरडा - ओरड केली. त्यामुळे शिपायांनी धाव घेत पाहणी केली असता बॅरेक मधील संडासात खिडकीच्या लोखंडी गजाला पांढऱ्या रंगाचे कापड बांधून त्याच्या सहाय्याने कैदी जामसिंग पावरा याने गळफास घेतल्याचे आढळले. अंमलदार रमेश मुंगसे यांना माहिती देवून वरिष्ठांना कळविण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश पाटील यांनी त्या कैद्याची तपासणी करून त्याला पहाटे ४ वाजता मयत घोषित केले आहे. याबाबत शहर पोलिस ठाण्यात प्राथमित नोंद करण्यात आली आहे.



# आव्हानांचा सामना करण्यासाठी हिंदू संघटन आवश्यक

## संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांचे प्रतिपादन



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** संघटनेत ताकद असते. आपल्या देशापुढील अनेकविध आव्हानांचा सामना करायचा तर त्यासाठी विज्ञान- तंत्रज्ञाना सोबत हिंदूंची संघटित शक्ती उभी करणे अगत्याचे आहे. त्या शक्तीचे विस्मरण होवू नये म्हणून विजयादशमी उत्सव व शस्त्रपुजन ही आपली परंपरा आहे" असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र गुजरात व गोवाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ.जयंतीभाई भाडेसिया यांनी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुणे महानगरातील संभाजी भागाच्या वतीने आयोजित विजयादशमीच्या शस्त्र पुजन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास, तर प्रमुख पाहुण्या म्हणून आंतरराष्ट्रीय विशेषज्ञ- स्वयंचलित वाहन तंत्रज्ञान व एआरएआयच्या माजी संचालिका सौ.रश्मी उर्ध्वरेषे या उपस्थित होत्या.

काळानुरूप देशापुढील आव्हाने बदलली आहे. दहशतवाद, भाषावाद, अस्पृश्यता, घुसखोरी, बहुराष्ट्रीय विदेशी कंपन्यांचे आक्रमण, भ्रष्टाचार, वायू प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग हे नवनवीन दानव आपल्यासमोर आव्हान बनून उभे आहेत. यांच्यावर विजय मिळविण्यासाठी संघटित शक्तीची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रश्मी उर्ध्वरेषे यांनी आपल्या मनोगतामध्ये "भारतीय ऑटोमोबाईल उद्योग,त्याची बलस्थाने आणि भविष्यातील ऑटो क्षेत्रातील वाटचालीचा आढावा घेतला. माझे वडील स्वतः संघ कार्यकर्ते होते. संघ आणि स्वयंसेवकांची शिस्त व देशभक्ती अनुकरणीय आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

विजयादशमी शस्त्र पुजन कार्यक्रमाच्या सुरवातीला ध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर उपस्थित संघ स्वयंसेवकांनी योगासने, पदविन्यास, दंड युद्ध, घोष आदी प्रात्याक्षिके सादर केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संभाजी भागाचे भाग कार्यवाह सुधीर जवळेकर यांनी कार्यक्रमात प्रस्तावना केली व पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्सव व त्यांच्या उत्सवाविषयीची माहिती सांगितली.या कार्यक्रमाला सुमारे बाराशे स्वयंसेवकांची उपस्थिती होती तर भागातील पाचशेहून अधिक नागरिक माता-भगिनींची उपस्थिती होती.

# घटनास्थळीच बैठक घेत तत्काळ रस्त्याचे काम करण्याचे नंदकिशोर मुंदडांनी दिले आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** नुकतीच परवाला साखर कारखान्याला जाताना येल्डा येथील ऊसतोड मजूर कुटूंबाबाबतीत अत्यंत ह्रदयद्रावक घटना घडली. कांबळे कुटुंबाचे भविष्य-आधार असणाऱ्या केवळ ११ वर्ष वय असलेल्या कोवळ्या अमोल कांबळे नामक मुलाच्या मृत्यूनंतर त्या कुटुंबाचा आक्रोश पाहता आणि त्याची सर्वोतोपरी परिस्थिती पाहता या घटनेला प्रामुख्याने कारणीभूत असलेल्या संबंधित रस्त्याचे काम मिळालेल्या गुत्तेदारावर प्रथमतः तर मुलाच्या स्थलांतरास जबाबदार असणाऱ्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय आणि शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवरती मनुष्यवधाचा गुन्हा तर दाखल झालाच पाहिजे. त्या कुटुंबास या दोन्ही कार्यालयाकडून आणि शासनाकडून आर्थिक मदत तर मिळालीच पाहिजे. परंतु हे होण्याअगोदर तात्काळ हा रस्ता तयार होणे नितांत गरजेचे आहे. जेणेकरून करून आता ईतका मन हेलावणारा दुखःद प्रसंग दुसऱ्या कोणावर बेतला नाही पाहिजे हे माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने माझे प्रथम प्राधान्य आता रस्ता पुर्ण करुन घेण्यास आहे असे सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

घटनास्थळीच वनविभाग-गुत्तेदार आणि कार्यकारी अभियंत्यासह आवश्यक अधिकाऱ्यांची बैठक प्रत्यक्ष वान नदी पुलावरच बैठक घेऊन दिले आदेश जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा यांनी आमदार प्रतिनिधी या नात्याने संबंधित रस्त्याच्या कामाचा गुत्तेदार, रस्ते वाहतूक व दळणवळण कार्यालय कार्यकारी अभियंता, सा.बां. कार्यकारी अभियंता व विभागीय फॉरेस्ट ऑफिसर या सर्वांना एकत्र प्रत्यक्ष वान नदीच्या पुलावर बोलावून परिस्थिती दाखवून तात्काळ रोडचे काम करण्याचे दिले आदेश दिले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील महिन्या अखेर मला हा रस्ता पुर्ण करुन पाहिजे. परंतु त्यातल्यात्यात मला या घाटापासुन मागे-पुढे अर्धा-अर्धा असा ऐक कि.मी.रस्त्याचे काम दिवाळीच्या आत पाहिजे अशा शब्दांत सुनावले. नंदकिशोर मुंदडा यांनी घेतलेला पवित्रा लक्षात घेऊन वन विभागाची परवानगी उद्याच्या सोमवारी देण्याचे आश्वासन विभागीय वन अधिकारी यांनी दिले. दिवाळीपर्यंत घाट संबंधित तर पुढील ऐक महिन्यात रोडचे काम पूर्ण करून देतो असा शब्द देणा-या निर्लज्ज-निगरगट्ट गुत्तेदाराने अपघात अर्धवट रस्त्यामुळे झाल्याचे बैठक अखेर पर्यंत मान्य केलेच नाही. दिवाळीच्या आत घाटाचे आणि संबंधित मागे-पुढे रोडचे काम पुर्ण करुन देतो. तर बाकी रस्त्याचे कामही सोबतच सुरू करून तेही महिनाभरात तात्काळ पूर्ण करण्याचे आश्वासन देखील गुत्तेदार यावेळी दिले. परंतु कार्यकारी अभियंता अथवा गुत्तेदार यांनी तीन तास झालेल्या चर्चेतून शेवटपर्यंत नुकत्याच झालेल्या अपघातात आमच्या कंपनीची चुक आहे वा संबंधित गुत्तेदाराने ही माझी चूक आहे हे शेवट मान्य केलेच नाही. यात कोण दोषी आहे--नाही हे मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पुढे या.न्यायालयाच्या निर्णयाने ठरेलच. परंतु नंदकिशोर मुंदडा यांच्या यापुर्वीच्या कार्यप्रणालीचा अनुभव घेता आणि त्यांची अत्यावश्यक कामातील तत्परता पाहता आता या कामासाठी ते पुढे सरसावले आहेत म्हणजे हे काम आता नक्कीच मार्गी लागणार असा विश्वास त्या सभोवतालच्या ग्रामीण भागातील अनेकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. तेंव्हा आता दोन पिढ्या तरी कांबळे कुटुंबाची दिवाळी साजरी होणार नाही. परंतु त्यांचा घटनाक्रम पाहता दिवाळी अखेर ईतर मोठ्या प्रमाणात या भागातील ऊसतोड मजूर राज्यात व राज्याबाहेर कारखान्यांना पिढ्यानपिढ्या पासून जात आहेत. तेंव्हा त्यांच्यासाठी तरी हा रस्ता किती तत्परतेने पुर्ण होतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.



# लासूरच्या जि.प. शाळेस निधी देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत जीर्ण झाली असून आत्तापर्यंत प्रत्येक पावसाळ्यात या इमारतीचा स्लब कोसळला असून दैव बलवत्तर म्हणुन काही दुर्घटना घडली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेची जीर्ण झालेली इमारत पाडून तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन नवीन इमारत बांधण्याची मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाद्यक्ष अमोल पाटील जाधव यांनी पालकमंत्री संदीपान भुमरे यांना लेखी निवेदन देऊन केली आहे.



# डांगुर्णे-सोंडले ग्रुप ग्रा.पं.मध्ये घरकुल घोटाळ्याचा संशय

## मंजूर घरकुल न बांधता बिले काढण्यात आल्याचा प्रकार : केंद्रीय मानव अधिकार संघटनेचे पंचायत समितीला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिंदखेडा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डांगुर्णे -सोंडले या गावातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गोरगरिबांना लाभ न देता गावातील सिमेंट कॉंक्रीटचे पक्के घरकाम असलेल्या श्रीमंतांना प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला आहे विशेष म्हणजे दुसऱ्यांचे जागा व घरकाम दाखवत बोगस लाभार्थ्यांनी पैसे लाटण्याचा आरोप ही धुळे जिल्हा केंद्रीय मानव अधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोरे यांनी केला आहे.तसेच या घरकुल घोटाळ्याची सखोल चौकशी व्हावी अशा मागणीचें निवेदन शिंदखेडा पंचायत समिती प्रशासनाला दिले आहे त्यांच्यासमवेत यावेळी अन्यायग्रस्त लाभार्थी उपस्थित होते. प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत घर न बांधता पैसे काढण्यात आले आहे खऱ्या लाभार्थ्यांना डावलून रोजगार सेवक व डांगुर्णे सोंडले या गावातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल चे काम करण्यात आलेले आहे . या कामाचे अत्यंत निष्कृष्ट काम करण्यात आले आहेत . राजेंद्र ओंकार मोरे व इतर लाभार्थी यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले आहेत या लाभार्थींना स्वयंरोजगार सेवक हा दिशाभूल करून पंचायत समितीचे अधिकाऱ्यांनी मला तुमचे घरकुल बांधायला कॉन्ट्रॅक्ट दिला आहे जर तुम्ही मला घरगुती पैसे काढून नाही दिले तर मी तुमचे घरकुलचे काम होऊ देणार नाही अशी धमकी डांगुने सोंडले गावातील गोरगरीब आदिवासींना देत आहे व या घराचे काम स्वतः स्वतः स्वयंरोजगार सेवक हा करत आहे व बोगस लाभार्थ्यांना आर्थिक फायद्यासाठी खऱ्या लाभार्थ्यांच्या घराजवळ मजुरांचा जीपीएस फोटो काढून वरिष्ठ गृहनिर्माण अभियंता यांना देऊन संगत मताने भ्रष्टाचार केला जात आहे.. गेल्या कित्येक वर्षापासून हा भोंगळ कारभार सुरू असून खऱ्या लाभार्थ्यांना डावलून केवळ आर्थिक फायद्यासाठी श्रीमंतांचे नाव देऊन व घर गोर गरिबांचे दाखवून पैसे लाटण्याचा महाप्रताप सुरू असल्याचा आरोप केंद्रीय मानव अधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोरे यांनी केला आहे. गृहनिर्माण अभियंता,स्वयंम रोजगार सेवक यांची चौकशी करून कार्यवाही करा अशी मागणी शिंदखेडा पंचायत समिती प्रशासनाला निवेदनातून केली आहे.





# अपंगांचे कैवारी डॉ. संतोष मुंडे यांचा गोव्यात सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** परळी तालुक्यातील नाथ्रा या छोट्याशा गावात डॉक्टरच्या पोटी जन्माला आलेले पुढे स्वतःही डॉक्टर म्हणून वैद्यकीय व्यवसायात आलेले संतोष मुंडे यांना शालेय-महाविद्यालय जीवनापासूनच सामाजिक कार्याची प्रचंड आवड असल्याने ते सामाजिक कार्यापासून कधीच बाजूला सरकले नाहीत. वडील डॉ. एकनाथराव मुंडे हे परळी शहर-ग्रामीण भागासह बीड जिल्ह्यातील एक नामांकित कान-नाक-घसा (ENT) तज्ज्ञ डॉक्टर म्हणून परिचित. परंतु तेही सामाजिक विचाराने प्रेरित असल्याने त्यांनी मुलगा संतोष यांना कधीच केवळ वैद्यकीय व्यवसाय करावा असे बंधन न घालता आपला व्यवसाय सांभाळून तुला जे-जे चांगले करता येईल ते करायला माझी कधीच हरकत असणार नाही असे सांगितल्यामुळे मुळातच सामाजिक कार्याची आवड असलेल्या संतोष मुंडे यांना यामुळे अजूनच पुष्टी मिळाली, नव्हे एक प्रकारे बळच मिळाले. नाथ्रा गावाच्या मातीतच सामाजिक-राजकीय कार्याची चळवळ दडलेली होती म्हणून तर या छोट्याशा खेडेगावाने गोपीनाथरावजी मुंडे सारखा राष्ट्रीय दर्जाचा लोकनेता जन्माला घातला. तर त्यांच्या या प्रवासाच्या मदतीला गावकऱ्यांसह वडील बंधू स्व. पंडितअण्णा मुंडे यांनी खंबीर साथ दिली म्हणून या गावाने आणि पुढे राज्यातील जनतेने अगदी केंद्रीय मंत्री आणि उद्याचे मुख्यमंत्री इथपर्यंत गोपीनाथरावजी मुंडे यांना नेऊन ठेवले. पुढे कालांतराने एका मागोमाग पंडितआण्णा आणि गोपीनाथरावजी मुंडे हे दोन्ही बंधू कालवश




झाल्यानंतर परिवारातील-घरातील धनंजय-पंकजा-प्रीतम आणि अलिकडे अजय मुंडे बंधु-भगिणींनी स्व. पंडितआण्णा मुंडे आणि गोपीनाथरावजी मुंडे या दोन्ही बंधूंच्या आशीर्वादाने, राजकीय वरदहस्ताने व आपल्या कष्टाने बीड जिल्ह्याच्या-महाराष्ट्राच्या आणि केंद्राच्या राजकारणात आपापल्यापरीने चुणूक दाखवत राजकीय क्षेत्रात आपले नाव केले. पण हे करत असतानाच याच नाथ्रा गावच्या मातीत राजकारण अगदी थोडं परंतु समाजकारणाचं घोडं अगदी तन-मन-धनाने दामटणारे व्यवसायाने डॉक्टर असतानाही अपंग-दिव्यांग यांच्यासाठी आपले काहीतरी देणे लागते एवढ्या एकाच ध्यासाने, ध्येयाने प्रेरीत होऊन पुढे सबंध महाराष्ट्रातील अपंग-दिव्यांगांचे एकमेव कैवारी असणाऱ्या आ. बच्चू कडू यांच्या संपर्कात येऊन त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन डॉ. संतोष मुंडे यांनी यापुढे आपले उर्वरित आयुष्य आपले वैयक्तिक जीवन जगताना आता दिव्यांगांसाठीही जगायचे, मागे हटायचे नाही अशी खुणगाठ मनाशी बांधून बच्चू कडू यांच्या खांद्याला खांदा लावून आपले कार्य आहे त्यापेक्षा आणखीनच जोमाने सुरू केले ते आजतागायत कधी मागे पाहिलेच नाही. दिव्यांगांप्रतीचे काम दिवसेंदिवस वाढतच गेल्याने अल्पावधीतच डॉ.संतोष मुंडे यांना मराठवाड्याचा अपंगांचा कैवारी तथा मिनी बच्चू कडू म्हणून ओळखले जाऊ लागले. ही ओळख निर्माण होत असतानाच राजकारणात चाणाक्ष म्हणून ज्यांची महाराष्ट्रभर ओळख आहे अशा माजीमंत्री धनंजय मुंडे यांनी नाथ्रा गावात आता राजकारणात नाही. परंतु सामाजिक क्षेत्रात एक हिरा जन्म घेतोय, चमकतोय हे ओळखून शर्थीच्या प्रयत्नाने मनधरणी करून आपले कसब पणाला लावून डॉ. संतोष मुंडे यांना पुर्णवेळ राजकारणात खेचले आणि लवकरच त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष करून राजकारणात सक्रिय केले. तिथेही अल्पावधीतच राजकारण थोडे परंतु आपली नाळ ज्याच्याशी जन्मजात बांधली आहे अशा समाजकारणाचे घोडे दामटत डॉ. मुंडे यांनी प्रदेश कार्यकारणीत आणि पवार कुटुंबातही आपली छाप पाडली खरी, परंतु हा आपला मार्गच नसून आपला मूळ मार्ग हा समाजकार्याचा आहे. राजकारण हे त्या नंतर कामापुरते आहे. हे ओळखून जनसामान्यांच्या व स्वतःच्या कामापुरते मोजके राजकारण करत डॉ. मुंडे यांनी आपले बच्चू कडू यांच्याशी असलेले संबंध तीळमात्र कमी न होऊ देता दिवसेंदिवस ते वृद्धींगत करत राज्यातील दिव्यांग प्रश्नांची चळवळ थेट केंद्रात नेली. ती गल्ली ते दिल्ली पोहोचण्याचे मोठे काम माजीमंत्री बच्चू कडू यांच्या खांद्याला खांदा लावत सुरूच ठेवले आणि मग समाजकार्यात उत्तुंग भरारी मारलेल्या संतोष मुंडे यांची दिव्यांगांप्रतीची आस-भूमिका पाहून बच्चू कडू यांनीही राज्य आणि केंद्रातील प्रत्येक बैठकीला डॉ.मुंडे यांना सोबत ठेवून कसे दिव्यांगांचे जास्तीत जास्त प्रश्न सोडवून घेता येतील एवढेच मनी ठेवून आपले कार्य सातत्याने सुरू ठेवले आणि आज त्याच कार्याची पावती म्हणून या मराठवाड्याच्या मिनी बच्चू कडू तथा अपंगांचा कैवारी म्हणवणाऱ्या डॉ. संतोष मुंडे यांच्या एकंदरीत समाजकार्यातील गरुडझेप पाहून गोवा सरकारने राजधानी पणजी येथे मुख्यमंत्री मा.डॉ. प्रमोदजी सावंत यांच्या हस्ते "Young Politician And Social Activists" यासाठी Idols Of Maharashtra या मोठ्या मान-सन्मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

### मराठवाडा व माझ्यासाठी ही अत्यंत गर्वाची बाब आहे : आ.बच्चु कडू

डॉ.संतोष मुंडेंच आजपर्यंतच एकंदरीत सामाजिक कार्य पाहता आणि विशेषत: त्यांची दिव्यंगांप्रतीची ओढ आणि आस पाहता त्यांचा सन्मान करण्याचे महाराष्ट्र सरकारला सुचले नाही ही जरी दुर्दैवाची बाब असली, तरी परराज्यात म्हणजेच गोव्यासारख्या समृद्ध-संपन्न राज्याच्या वतीने मला बारक्या भावाच्या ठिकाणी असणाऱ्या डॉ. संतोष मुंडे या सामाजिक कार्यकर्त्याचा गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते आज एवढ्या मोठ्या पुरस्काराने सन्मान-गौरव झाला ही बाब जेवढी प्रहार पक्ष-संघटना, कडू परिवार यांच्यासाठी भूषणावह आहे. तेवढीच ती मराठवाड्यासाठीही भूषणीय आहे असे गौरवउद्गार डॉ.संतोष मुंडे यांच्या बाबतीत माजीमंत्री आ. बच्चू कडू यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना काढले. या मिळालेल्या पुरस्काराने मुळ गाव नाथ्रा, परळी, संपूर्ण बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील प्रत्येक स्तरातून डॉ.संतोष मुंडे यांच्यावर अगदी भरभरून अभिनंदन-कौतुकाचा सोशियल मिडीयासह विविध माध्यमातून मोठा वर्षाव होत असुन त्यांचे माजीमंत्री आ.बच्चु कडू यांच्यासह माजीमंत्री पंडीत रावजी दौंड, आ.धनंजय मुंडे, खा.डॉ.प्रितम मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव माजीमंत्री पंकजा मुंडे, मा.आ.संजय दौंड, पृथ्वीराज साठे आणि मित्र परिवाराकडूनही अभिनंदन करण्यात आले.



# मराठवाडा शिक्षक संघाचा बीडमध्ये मोर्चा

## जुनी पेन्शन, शंभर टक्के अनुदानासाठी हजारो शिक्षक रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अंशदायी पेंन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेंन्शन योजना लागू करावी, निकषपात्र विनाअनुदान शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रा नुसार शंभर टक्के अनुदान देवून शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी, शिक्षकांना तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी या व इतर मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाने येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. जिल्ह्यातील हजारो शिक्षकांनी मोर्चात सहभाग नोंदवून शासनाप्रती असलेली आपली नाराजी आणि असंतोष व्यक्त केला यात महिला शिक्षिकांची संख्या लक्षणीय होती. येथील सिद्धिविनायक कॉम्पलेक्स पासून मोर्चास सुरवात झाली. सुभाष रोड अण्णाभाऊ साठे चौक मार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा मार्गदर्शक पी.एस. घाडगे, विद्यमान अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. पंजाब, राजस्थान, दिल्ली, छत्तीसगड, झारखंड आदी राज्यांनी अंशदायी पेंन्शन योजना रद्द करून जुनी पेंन्शन योजना लागू केली असताना महाराष्ट्र सरकार ही योजना लागू करीत नसल्याने शिक्षकांमधे तीव्र असंतोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. विनाअनुदानित शाळेवर हजारो शिक्षक गेली वीस बावीस वर्षां पासून विनावेतन काम करत आहेत. पुरोगामी महाराष्ट्रावरील हा कलंक असून राज्याच्या महान शैक्षणिक वारशाचा अपमान आहे. त्याच प्रमाणे हजारो उच्च शिक्षित प्राध्यापक तासिका तत्वावर काम करताहेत ही त्यांनी घेतलेल्या उच्च शिक्षणाची घोर चेष्टाच आहे. या प्राध्यापकांना नियमित प्राध्यापक म्हणून मान्यता देण्यात याव्यात, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त पदे तात्काळ भरावीत, तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतनेत्तर अनुदान द्यावे आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत शासनास पाठविण्यात आले. मोर्चात मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, प्रा. डॉ मारोती तेगमपुरे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे , बंडू आघाव, अशोक मस्कले, नामदेव काळे, सुभाष शेवाळे, विजय गणगे, परवेज देशमुख, व्यंकटराव धायगुडे, हनुमंत घाडगे, गोवर्धन सानप, मनोज सातपुते, तावरे डी. एम, दत्तात्रय चव्हाण, अविनाश काजळे, युवराज मुरूमकर, विष्णू वळेकर, प्रदीप चव्हाण, हेमंत धानोरकर, शेख आय. जे, एम.डी. डोळे, अशोक गाडेकर, शिवाजी ढोबळे, जीवनराव थोरात, बाळासाहेब टिंगरे, दादासाहेब घुमरे, बाळासाहेब काळुशे, शामसुंदर साळुंके, श्रीनिवास काकडे, हनुमंत गवारे, तुळशीदास सोळंके, जगदिश्चंद्र प्रेमचंद तोष्णीवाल, नदीम युसूफ, पुरुषोत्तम येडे पाटील, संजय गोरे, अलिशान काझी, सुनिल नागरगोजे सहभागी झाले होते. मोर्चातस राज्य सरकारी कर्मचारी समन्वय समिती, मुख्याध्यापक संघ, संभाजी ब्रिगेड, बालहक्क संरक्षण संघ, विनाअनुदानित कृती समिती, आयटकने पाठींबा दिला.

# गवळी महिला बचत गटाच्या स्वस्त धान्य दुकानाचा आ. मुंदडा यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील लालनगर परिसरातील गवळी महिला बचतगट यांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या स्वस्त धान्य दुकानाचा शुभारंभ आज केज विधानसभा मतदार संघाच्या आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी त्यांच्या सोबत तरुणाईचे आधारस्तंभ, लाडके युवानेते सुनिल लोमटे, मधुकर काचकुंडे, नाजेमभाई पठाण, महिला बचत गटाच्या अध्यक्षा शहेनाज अजीज परसुवाले, सचिव रजिया अहेमद पप्पुवाले, लालनगर् येथिल उपस्थित् मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पैठणमध्ये मोसंबीचोर अटकेत



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मोसंबीचे भाव वाढत असल्याने मोसंबी चोराचा सुळसुळाट वाढला असल्याच्या घटना घडत असताना मोसंबीची चोरी करुन पसार होणार्या चोरट्यांचा पाठलग करत चार आरोपींना पैठण पोलिसांनी अटक केली. पैठण तालुक्यातील करंजखेडा शिवरातील मोसंबी तोडून गोणीत भरून टाटा एस गाडीने चोरुन नेत आसल्याची माहिती पैठण पोलिसांना मिळताच रात्री गस्तीवर आसलेल्या पोलिसांनी गाडीचा पाठलाग करत पकडले या गाडीत एक टन मोसंबी किंमती पंचवीस हजार रुपये किंमतीची मोसंबी अढळुन आली. हि कारवाई पोलिस निरिक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी चिडे, चव्हाण, ढाकणे, पहिलवान यांनी केली.

# सावळदबारा येथे महात्मा गांधी -लालबहादूर शास्त्री यांची जयंती



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे आज ग्रामपंचायत कार्यालयात राष्टपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. अहिंसेचे पुजारी राष्ट्रपिता महात्मा गांधी व जय जवान जय किसान चा नारा देणारे स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान,भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांचे जीवन चारित्र्य विद्यार्थ्यांनी वाचून त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रा. जीवन कोलते यांनी व्यक्त केले. अध्यक्ष स्थानी सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील तथा उपसरपंच मो.आरिफ मो लुखमान तर प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. मराठी शाळेचे शिक्षक भागवत गायकवाड, ग्रामसेवक सुधीर भालेराव होते. याप्रसंगी अनुसूचित जाती जमातीचे तालुका अध्यक्ष सुनील माकोंडे, बिट जमादार मिरखाँ तडवी,ग्रा.प.सदस्य सुनील शिप्पलक, ग्रामसेवक सुधीर भालेराव, शफी तडवी, जमाल तडवी, मा.ग्रा.प.सदस्य फकीराभाऊ तडवी, योगेश खैरे, टिकारे,ग्रामपंचायत कर्मचारी सुभाष मानकर, आणिल राजपूत, संजय नप्ते शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मागील वर्षीची भगर दळली लासूरगावच्या गिरणीत

## प्रकरण दाबवण्यासाठी लासूर स्टेशन येथील त्या व्यापाऱ्यात व प्रशासनाच्या अधिकाऱ्यात लाखमोलाचा अर्थपूर्ण तह झाल्याची चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**लासूर स्टेशन :** यंदाच्या नवरात्री उत्सवच्या सुरुवातीलाच औरंगाबाद जिल्ह्यात भगरीतुन विषबाधा झाल्याचा प्रकार सर्वप्रथम गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरातील सावंगी, शिल्लेगाव, बुट्टेवडगाव, गोपाळवाडी आदीसह इतर गावात नवरात्रीच्या पहिल्याच माळेला घडला त्यामुळे अर्धशतकाच्या पुढे उपवासकरू नागरिकांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते त्यात लहान मुलांचाही समावेश होता. त्यापाठोपाठ वैजापूर शहरात चारशे, महालगावला पाच, कन्नड तालुक्यातील बनशेंद्रा, बोलटेक तांडा, जैतापूर, बोलटेक तांडा, नांदगीर वाडी आदी गावातील नागरिकांनाही भगरीच्या पिठातुन विषबाधा झाल्याने त्यांना कन्नड येथील शासकीय व खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते त्यापैकी काहींना अत्यावस्थ वाटल्याने औरंगाबादला हालवले होते. मात्र विषारी भगरीचे मुख्य केंद्र हे लासूर स्टेशन असल्याची चर्चा जिल्हाभारत चालू असली तरी दोषी व्यापाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम प्रशासन करत आहे कारण लासूर स्टेशन येथील एका बड्या व्यापाऱ्याने कोरोनोकाळातील शिल्लक असलेली भगरीचे पीठ करून जिल्हाभरात किरकोळ दुकानदारांना विकल्याची चर्चा होत असून या व्यापाऱ्याने सुमारे दोन टन भगर दळून त्याचे पीठ करून विक्री केले होते. तेच भगरीचे पीठ जिल्हाभरात विकल्याने विषबाधेचा प्रकार घडला होता. ही सदर भगर लासूर स्टेशन येथील त्या व्यापाऱ्याने लासूरगाव येथील एका गिरणी चालकांकडून दळून घेतली असल्याची माहिती गोपनीय सूत्राकडून मिळाली. या गिरणीचालकाचीही झाडाझडती प्रशासनाने केली. मात्र या प्रकाराची कुणकुण लासूर स्टेशन येथील त्या बड्या व्यापाऱ्याला लागताच त्याने प्रकरण दबावण्यासाठी चौकशीला लासूरगाव येथील गिरणीत आलेल्या अधिकाऱ्यासोबत लाखमोलाची अर्थपूर्ण चर्चा होऊन तह झाल्याची चर्चा होत असून खरा प्रकार काय हे मात्र गुलदस्त्यात असून त्या गिरणीचालकांची चौकशी नेमक्या कोणत्या विभागाच्या अधिकाऱ्याने केली व तो अधिकारी कोण होता याचा पोलिसांनी तपास लावून दूध का दूध पाणी पाणी करावे व जनतेसमोर खरा प्रकार उघड करण्याचा यक्षप्रश्न आत्ता पोलिसांसमोर आ वासून उभा आहे.

# आ. प्रशांत बंब यांचा जनावरे लम्पीमुक्त मतदारसंघाचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज



**लासुर स्टेशन :** माझ्या गंगापूर खुलताबाद मतदार संघातील 68 हजार लहान मोठ्या जनावरांपैकी 65 हजार पाचशे जनावरांचे लसीकरण पूर्ण झालेले असून वाड्या वस्त्यावरील उर्वरित अडीच ते तीन हजार लसीकरण आगामी तीन ते चार दिवसात संपवणार आहे. त्यामुळे हा माझा मतदार संघ भारतातील पहिला मतदारसंघ ठणार आहे की ज्यात तालुक्यातील एकही जनावर लम्पि लसीकरण विना राहणार नसल्याचे आमदार प्रशांत बंब यांनी सांगून जनावरे लम्पि मुक्त हा संकल्प केवळ माझा मित्र परिवार, शासकीय यंत्रणा, त्यांचे कर्मचारी, खाजगी डॉक्टर्स मित्र यांनी दिवस रात्र झोतून काम केल्यामुळे गंगापूर - खुलताबाद तालुक्यात लम्पि लसीकरण शक्य झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. लासुर स्टेशन येथून जवळच असलेल्या नागपूर - मुंबई महामार्गावरील खडकनारळा फाटा (ता. गंगापूर) येथे सोमवार (दि.3) रोजी जनावरांना लम्पि लसीकरण कॅम्पला त्यांनी भेट दिली त्यावेळी त्यांनीही माहिती माध्यमांना दिली. पुढे बोलताना बंब म्हणाले की,वाड्या वस्त्यावरील बऱ्याच शेतकरी बांधवांना माहिती नव्हते की जनावरांवर संसर्ग जन्य लम्पि नामक आजार येऊन तो झपाट्याने पसरतक आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जनावरे दगावत होते. आजही ज्या ठिकाणी लसीकरण पोहचले नाही त्या ठिकाणची जनावरे दगावत आहेत. त्यावर आम्ही तात्काळ मोहीम उघडून अल्प अवधितच माझ्या सर्व सरकारी यंत्रणेने व मित्रांनी लम्पि लसीकरण लवकरच पूर्ण होत आहे. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील आम्ही घेतलेला लम्पि मुक्त जनावरे संकल्प काही दिवसातच पूर्णत्वास जात आहे. या नंतर आता कन्नड तालुक्यातील गावा गावातील जनावरे लम्पि मुक्त करण्याची मोहीम आम्ही सर्व भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतली असून पुढील दोन आठवड्यात हा तालुका देखील लसीकरण करून लम्पि मुक्त करणार आहोत. त्यासाठी आम्ही 60 हजार खाजगी लस विकत घेतलेल्या असून 70 ते 80 खाजगी डॉक्टर्सची टीम त्याच बरोबर सरकारी यंत्रणा देखील तयार असल्याचे सांगून यापुढेही शेतकरी बांधवांनी ज्या जनावरांना लम्पि आजार जडला असेल किंवा लसीकरण बाकी असेल त्यांनी आमच्या मित्रांना तात्काळ 9975187777 व 9764331066 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा ते तुमच्यापर्यंत 24 तासाच्या आत आपल्याकडे येऊन जनावरांना लसीकरण पूर्ण करतील असे आवाहन देखील त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना केले.

दरम्यान यावेळी जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त डॉ. झोड, सहाय्यक आयुक्त गंगापूर डॉ. दडके, पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार डॉ. चामर गोरे, डॉ. अंतराये जंभाळा तसेच नंदकुमार गांधीले, भाजप तालुका अध्यक्ष शिवनाथ मालकर, सुरेश जाधव, राजु गायकवाड, गणेश व्यवहारे, कल्याण पवार,अमोल जाधव, भगवान गाढे,विकी मढीकर, संजय पांडव, अशोक सौदागर, रवी चव्हाण, एम.बी. थोरात, स्वप्नील देशमुख यांच्यासह परीसरातील शेतकरी बांधव, कार्यकर्ते उपस्थित होते.



# मानवत येथे दांडिया, गरबा व नृत्य महोत्सवाचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** येथील मैत्री ग्रुपच्या वतीने शारदा नवरात्र महोत्सवा निमित्त आज दांडिया, गरबा , नृत्य कार्यक्रम मानवत शहरातील श्री रेणुका मंगल कार्यालयात पार पडला. मानवत शहरातील मैत्री ग्रुपच्या वतीने घेण्यात आलेल्या दोन दिवशीय दांडिया, गरबा व नृत्य कार्यक्रमास शहरातील १०० महिलांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये सर्वांना बक्षीस वाटप करण्यात आले. नवरात्रो महोत्सात दोन दिवसीय चाललेल्या कार्यक्रमां मध्ये आलेल्या महिला प्रेक्षकांनी दांडिया, गरबा, नृत्याचा आनंद लुटला. या कार्यक्रमां मध्ये पहिल्या दिवशी सर्व महिलांनी घागरा तर दुसऱ्या दिवशी आंध्रालुक पोशाख परिधान करण्यात आला होता. दोन दिवसीय संपन्न झालेल्या या गरबा नृत्य दांडिया कार्यक्रमाने प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिताताई झाडगावकर, सुवर्णाताई महाजन, मीनाताई देशमुख, लक्ष्मीताई खक्के, विजयाताई बांगड, सरोजताई गुंडू,आरतीताई मंत्री व मैत्री ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेतले . या वेळी कार्यक्रमास शहरातील हजारो महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवीला होता.

# श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालयात स्वच्छता अभियान



**पूर्णा :** श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालय परिसरात श्रमदान करण्यात आले . श्रमदानाची सुरुवात ही 'झाडे लावा झाडे जगवा' तसेच 'पर्यावरण रक्षणासाठी वृक्षांचं महत्व मानवी जीवनासाठी किती अमूल्य आहे' ही संकल्पना समोर ठेवून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय दळवी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः श्रमदान करून स्वच्छता केली. श्रमदान अभियान उपक्रम यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ सर्व प्राध्यापक वृंद यांनी खूप परिश्रम घेतले. हा कार्यक्रमाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्पा गंगासागर व डॉ. अजय कुर्रे यांनी श्रमदानाचे नियोजन शिस्तबद्ध केले. हा कार्यक्रमयशस्वी करण्यासाठी मंचक वळसे, गजानन भालेराव, कालिदास वैद्य, नागोराव साळवे, दत्ता जाधव यांनी भरपूर परिश्रम घेतले. श्रमदान करण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मैलगडाच्या पायथ्याशी आदिवासी ग्राम रायपुर येथे कन्या सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** शक्ती आणि भक्तीचा उत्सव म्हणजे नवरात्र. भारतीय संस्कृती ही मातृ देवो भव आहे आणि म्हणूनच दरवर्षी सन्मान परिवार जळगाव जामोद तर्फे साजरा करण्यात येणारा कन्या सन्मान - कन्या पूजन कार्यक्रम पहिल्यांदाच जळगाव जामोद शहरापासून 18 किलोमीटर दूर, मैलगडाच्या पायथ्याशी, हिरव्या कंच सातपुड्याच्या सानिध्यात, दुर्गम आदिवासी ग्राम रायपुर येथे राजकीय पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, संत, शिक्षक, सन्मान परिवार, पत्रकार व आदिवासी गावकरी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी माऊली आश्रम मोहिदेपूर येथील माऊली महाराज म्हणाले की, स्त्री ही आदिशक्तीचे रूप आहेच. स्त्री जवळ ईश्वराने दिलेली नवनिर्मितीची, घरावर, समाजावर संस्कार करण्याची क्षमता असते. स्त्री ही अनेक रूपातून म्हणजे मुलगी, पत्नी, माता या अवस्थेतून जात असताना ती धर्मही पाळते म्हणून धर्मासोबत कर्माची जोड लागल्यावर त्याचा इतिहास बनतो . या कन्या सन्मान कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा रायपूर येथील 31 विद्यार्थीनींचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. त्यांचे पूजन करत त्यांना भेट स्वरूपात शालेय व इतर वस्तूंचे वाटप अपर्णाताई कुटे, आरती फाफट, भारसाकडे, सारिका देशमुख, लता तायडे, सातव मॅडम, येऊलताई , चैताली मानकर, आरती पलन यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अर्पणाताई कुटे, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, गटशिक्षणाधिकारी अधिकारी फाळके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विस्तार अधिकारी जावरकर, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख, राज्य संघटक अभिमन्यु भगत, डॉक्टर नंदू तायडे, सन्मान परिवाराचे प्रा. श्याम फाफट, तुकाराम कोकाटे, जफर बेगसर, महादेव सातव, रवी बोडखे, अजिंक्य टापरे , पत्रकार अर्शद ईक्बाल, विठ्ठल गावंडे तसेच सन्मान परिवाराचे राजेश कोकाटे ,दिगंबर हिवरकर, वैभव अढाव , सुनिल राजपूत तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहाय्यक शिक्षक अनिल भगत यांनी केले. अमेरिकेतील दातृत्व पोहोचला रायपुर मध्ये आदिवासी दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षक अनिल भगत करत असलेले प्रयत्न व शाळेत राबवित असलेले विविध उपक्रम सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहत असल्यामुळे अमेरिका स्थित सौ पूजा स्वप्निल चौधरी यांनी शाळेतील सर्व 31 विद्यार्थिनींना दिवाळीनिमित्त रंगबेरंगी कपडे व शाळेतील विद्यार्थ्यांना गणितीय खेळ कन्या सन्मान कन्या पूजन कार्यक्रमानिमित्त भेट स्वरूपात दिले .

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in